MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष तेविसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०२२

## संपादकीय

### बीबीसीची शतकपूर्ती

बीबीसी म्हणजेच ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (British Broadcasting Corporation). या संस्थेने २०२२ मध्ये शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. १४ नोव्हेंबर १९२२ ला बीबीसीचे रेडिओ प्रसारण सुरू झाले. या संस्थेचे मुख्यालय लंडन येथे असून, तिथूनच त्यांचे अनेक कार्यक्रम प्रसारित केले जातात. आता अनेक देशांत त्यांनी कार्यालये उघडली आहेत. सुरुवातीला काही तासांकरिताच हे प्रसारण असायचे. त्यात प्रामुख्याने बातम्या असायच्या. त्यानंतर मात्र बीबीसीचा पसारा वाढत गेला. आज संस्थेचे प्रसारण जगभर होते. या संस्थेत वीस हजारांहून अधिक लोक पूर्णवेळ कामाला आहेत. त्याचबरोबर वेगवेगळ्या देशांत विखुरलेल्या त्यांच्या बातमीदारांची संख्यादेखील खूप मोठी आहे. सुरुवात केली तेव्हा इंग्रजीतून प्रसारण होत असे. आता इंग्रजी भाषेखेरीज जगाच्या वेगवेगळ्या २८ भाषांमधून बीबीसीचे प्रसारण होत आहे.

मी जेव्हा पाचव्या इयत्तेत गेलो तेव्हा आम्हाला इंग्रजी हा विषय शिकवायला सुरुवात झाली. शाळेत जरी शिकवले गेले तरी व्यवहारात इंग्रजी ऐकण्याची किंवा बोलण्याची संधी आम्हाला क्वचितच मिळत असे. आपल्याला नवीन भाषा अवगत करायची असेल त्या भाषेतील नवनवीन शब्द कानावर पडणे आवश्यक असते. त्यासाठी आम्हाला इंग्रजी शिकविणाऱ्या शिक्षकांनी रेडिओवरील बीबीसीचे इंग्रजी भाषेतील प्रसारण ऐकण्याचा सल्ला दिला. त्यांचा सल्ला मान्य करून मागील ५५ वर्षे नियमितपणे मी बीबीसीचे रेडिओ कार्यक्रम ऐकत आहे. सुरुवातीला वाल्व्हचे रेडिओ होते, त्यानंतर आले ट्रांजिस्टर रेडिओ. त्यात आणखी प्रगती होऊन इंटरनेटच्या माध्यमातून रेडिओ कार्यक्रम ऐकणे शक्य झाले. आता तर मोबाईल फोनवर रेडिओचे कार्यक्रम ऐकता येतात. त्यासाठी बीबीसी ॲप डाऊनलोड करून घ्यावा लागतो.

जॉन लोगी बेअर्ड (John Logie Baird) या ब्रिटिश तंत्रज्ञाने विद्युत चुंबकीलहरींच्या माध्यमातून चलचित्रांचे प्रसारण करता येते हे १९२६ मध्ये दाखवले. यातून सुरुवात झाली ती दूरचित्रवाणीच्या म्हणजेच टेलिव्हिजनच्या प्रसारणाची. या संधीचा उपयोग करून बीबीसीने १९२९ मध्ये दूरचित्रवाणीचे कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांना

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

देखील चांगलीच प्रसिद्धी मिळाली. आज प्रत्येक देशात त्यांच्या स्वत:च्या स्वतंत्र वाहिन्या आहेत. तरीही जगभर बीबीसी टेलिव्हिजन केंद्राचे कार्यक्रम आवर्जून पाहिले जातात.

ज्ञान, मनोरंजन आणि शिक्षण हे तीन उद्देश घेऊन बीबीसी कार्यक्रम बनविते. यामध्ये शिक्षण हा एक अतिशय महत्त्वाचा दुवा आहे हे मला आवर्जून सांगावेसे वाटते. यासाठी बीबीसी रेडिओ आणि टेलिव्हिजन या दोन्ही माध्यमांतून अतिशय सुंदर असे शैक्षणिक कार्यक्रम निर्माण केले जातात. १९६९ मध्ये इंग्लंडने मुक्त विद्यापीठाची (Open University) स्थापना केली. या विद्यापीठात नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्याची गरज नव्हती. त्याउलट त्यांना घरबसल्या शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी लेखी साहित्याबरोबरच रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांचा उपयोग करण्यात आला. या कामात बीबीसीने पुढाकार घेऊन मिल्टन किन्स (Milton Keynes) येथील मुक्त विद्यापीठाच्या आवारातच बीबीसीचे एक स्वतंत्र केंद्र उभारले. विद्यापीठाला आवश्यक असलेले अनेक रेडिओ आणि दूरचित्रवाणीचे कार्यक्रम या केंद्रात तयार केले जातात. या संस्थेने निर्माण केलेले कार्यक्रम जगभर दाखवले जातात हे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. दोन दशकांपूर्वी व्हिजिटिंग रिसर्च फेलो (Visiting Research Fellow) म्हणून मी काही काळ मुक्त विद्यापीठात काम करीत होतो. त्यावेळेस या केंद्राला भेट देऊन तेथील कामाची माहिती घेण्याची मला संधी मिळाली. या अनुभवाचा विज्ञान आणि गणित शिक्षणासाठी मुक्त शिक्षण स्रोतांची (Open Educational Resources) निर्मिती करायला मला चांगलीच मदत झाली.

बीबीसी ही शासनाच्या मदतीने चालणारी संस्था आहे. परंतु त्यासाठी शासन फारसा खर्च करत नाही. या संस्थेचा खर्च हा लायसन्स फी (Licence Fee) मधून होतो. ज्यांच्याकडे रेडिओ किंवा टेलिव्हिजन संच आहेत त्यांनी दरवर्षी फी भरायची असते. देशभरातून जमा झालेली ही रक्कम बीबीसीला दिली जाते. त्याचबरोबर बीबीसीने काही स्टुडिओ बांधले आहेत. या स्टुडिओमध्ये नवनवीन ज्ञानवर्धक कार्यक्रम ते निर्माण करीत असतात. या कार्यक्रमाच्या विक्रीतून संस्थेला उत्पन्न मिळते. एक उदाहरण देऊन हा मुद्दा स्पष्ट करतो. चार्ल्स डार्विन यांनी १८३० च्या दशकात बिगल जहाजावर प्रवास करून अनेक वस्तू गोळा केल्या. त्यांचा अभ्यास करून त्यांनी उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडला. या प्रवासाची पुनरावृत्ती करून बीबीसीने एक चित्रफित निर्माण केली आहे. यासाठी त्यांना सुमारे पाच लाख पौंडाचा खर्च आला. त्यानंतर ही चित्रफीत जगभर विकून त्यांनी चांगलीच कमाई केली.

दूरचित्रवाणीवर प्रसारित करण्यासाठी बीबीसी जे कार्यक्रम करते त्यात खूप नावीन्यता असते. माझ्या स्मरणात असलेल्या दोन कार्यक्रमांचा मी इथे उल्लेख करू इच्छितो. विमानतळावर कार्य कसे चालते हे दाखवण्यासाठी बीबीसीने एक मालिका तयार केली होती. त्यात सगळ्या बाबी स्पष्टपणे दाखविल्या होत्या. उदाहरणार्थ, आपण जी बॅग चेक इन करताना काउंटरवर देतो ती बॅग नेमकी आपल्याच विमानात कशी जाते याचे सुंदर चित्रण मला एका कार्यक्रमात पाहायला मिळाले. याहीपेक्षा माझ्या लक्षात राहिलेला एक कार्यक्रम म्हणजे द अनसंग हिरोज (The Unsung Heros) हा आहे. काही शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ हे त्यांच्या कामामुळे प्रसिद्धीला येतात. पण बरेच शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ

(पृष्ठ क्र. १० वर)

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष तेविसावे/अंक ११/नोव्हेंबर २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | एक अलौकिक विज्ञानशिक्षकः डॉ. सुधाकर आगरकर | नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | चलत मुसाफिर मोह लिया रे... ? | प्रमोद वसंत बापट | ७ |
| ४) | परिसर वार्ता | संकलित | ११ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# एक अलौकिक विज्ञानशिक्षक : डॉ. सुधाकर आगरकर

*उपचारात्मक गणित पद्धतीचा शोध लावणारा थोर वैज्ञानिक डॉ. सुधाकर आगरकर – संपादक*

डॉ. सुधाकर आगरकर यांचा जन्म १ जुलै १९५१ रोजी झाला. त्यांचे शिक्षण; एम.एस.सी. (रसायनशास्त्र), नागपूर विद्यापीठ, १९७५ आणि पी.एच.डी. (विज्ञानशिक्षण), पुणे विद्यापीठ, १९८८; असे झाले आहे. त्यांच्या शोधनिबंधाचे शीर्षक, डेव्हलपिंग इन्स्ट्रक्शनल स्ट्रॅटेजीज टू ओव्हरकम डिफिकल्टीज इन लर्निंग सायन्स अँड मॅथेमॅटिक्स (विथ स्पेशल रेफरन्स टू सोशिओ-इकॉनॉमिकली डिप्राईव्हड स्टुडंटस) असे होते. १९७६ ते २०१३ दरम्यान टाटा मूलभूत विज्ञान संस्थेच्या 'होमी भाभा विज्ञानशिक्षणकेंद्रात' प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. धारावीतील आणि पश्चिम घाटातील आदिवासी मुलांसोबत कार्य करत त्यांनी 'उपचारात्मक विज्ञानशिक्षण व्यूहरचना (रेमेडिअल इन्स्ट्रक्शनल स्ट्रॅटेजी)' विकसित केली. सामाजिक दृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांना विज्ञानशिक्षण देण्यात तिचा खूप उपयोग होत असतो. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्याकरता 'मुक्तस्रोत शिक्षण सं-साधने' ही त्यांनी पहिल्या पिढीच्या विद्यार्थ्यांकरता विकसित केली. गेल्या तीन दशकांत विज्ञान आणि गणित शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी नाव कमावले आहे.



२०११ साली अवकाशप्राप्त झाल्यावर, मी नव्याने निवडलेल्या माझ्या अनुवादक्षेत्रात काम करण्याच्या हौसेपायी, संधींचा शोध घेत ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळात पोहोचलो. ते त्यावेळी त्यांच्या वेळणेश्वर येथील 'महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालया'करता प्राचार्यांचा शोध घेत होते. तिथेच डॉ. सुधाकर आगरकर यांचा माझा परिचय झाला. ते त्यावेळी टाटा मूलभूत विज्ञान संस्थेच्या 'होमी भाभा विज्ञानशिक्षणकेंद्रात' प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर विद्या प्रसारक मंडळाने त्यांची प्राध्यापक आणि अधिष्ठाता, 'ॲकॅडमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च' म्हणून नियुक्ती केली. पुढे विद्या प्रसारक मंडळाने 'महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालया'करता 'ज्येष्ठ शास्त्रज्ञ परिषदे'ची स्थापना केली. त्या परिषदेचा मी सुरुवातीपासूनच सदस्य राहिलो. त्यामुळे डॉ. सुधाकर आगरकर यांच्यासोबत राहण्याची, त्यांच्याशी बोलण्याची, त्यांची व्याख्याने ऐकण्याची संधी मला अनेकदा प्राप्त झाली. 'महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालया'ने घेतलेल्या 'समृद्ध कोकण' निबंधस्पर्धेकरता आम्ही दोघेच परीक्षकही होतो. त्यादरम्यान त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची माझ्यावर अमिट छाप पडली. त्यांची व्याख्याने ऐकताना विद्यार्थी जसे मंत्रमुग्ध होत असत तसाच मीही मंत्रमुग्ध होत असे.

डॉ. सुधाकर आगरकर यांना शैक्षणिक प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यांकन यांबाबत खूप विविध स्वरूपाचा व्यावसायिक अनुभव आहे. 'टॅलंटसर्च अँड नर्चर अमंग द अन्प्रिव्हिलेज्ड (१९८०-८६)', 'रेमेडिअल प्रोग्राम फॉर सेकंडरी स्कूल्स इन ट्राईबल रिजन्स (१९८७-९०)', 'इंप्रुव्हिंग टीचिंग ऑफ सायन्स अँड मॅथेमॅटिक्स थ्रू व्हॉलेंटरी ऑर्गनायझेशन्स (१९९०-९३)', 'क्वालिटीइंप्रुव्हमेंट प्रोग्राम फॉर आश्रम

---

प्रामाणिकपणा ही फार महाग गोष्ट आहे! कुठल्याही फालतू माणसाकडून ती मिळण्याची अपेक्षा करू नका.

स्कूल्स (१९९३-२०००)', 'इन-सर्व्हिस ट्रेनिंग ऑफ टीचर्स अँड टीचर एज्युकेटर्स (२०००-२००६)', आणि 'ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस फॉर स्कूल्स (२००७-२०१३)'. इत्यादी शैक्षणिक प्रकल्पांचे त्यांनी यशस्वी व्यवस्थापन केलेले आहे. हल्ली ते तुलनात्मक शिक्षणाचा अभ्यास आणि आंतरसंस्कृती संबंध विकसित करण्यात व्यग्र आहेत.

डॉ. सुधाकर आगरकर यांनी विज्ञान आणि गणित शिक्षणाच्या क्षेत्रांत पथदर्शी संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनाची काही क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत. 'इन्स्ट्रक्शनल स्ट्रॅटेजीज', 'यूज ऑफ डिजिटल रिसोर्सेस इन एज्युकेशन', 'टीचर्स प्रोफेशनल डेव्हलपमेंट'. सामाजिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांत त्यांना विशेष स्वारस्य आहे. मुंबई आणि आदिवासी भागांतील वंचित विद्यार्थ्यांकरता त्यांनी 'उपचारात्मक शिक्षण व्यूहरचना' विकसित केलेली आहे. या कामास आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विस्तृत मान्यता मिळालेली आहे. प्रबोधनार्थ त्यांचे संशोधन मांडण्याकरता त्यांना विकसित आणि अविकसित दोन्हीही देशांतून आमंत्रणे येत असतात.

शिक्षकांचे आणि शिक्षक प्रशिक्षकांच्या सेवेदरम्यानचे प्रशिक्षण या क्षेत्रातही डॉ. सुधाकर आगरकर यांना स्वारस्य आहे. विज्ञान आणि गणित शिक्षकांचे आणि शिक्षक प्रशिक्षकांच्या सेवेदरम्यानच्या प्रशिक्षणाकरता त्यांनी भारतात आणि विदेशांतही, अनेक अभ्यासवर्गही आयोजित केलेले आहेत. या अभ्यासक्रमांत आलेल्या अनुभवांतून सेवेतील शिक्षक आणि शिक्षक व प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाकरता त्यांनी एक अभ्यासक्रम (मॉड्यूल) तयार केलेला आहे. दैनंदिन शालेय विज्ञान आणि गणिताच्या शिक्षणाकरताही त्यांनी उपयुक्त शिक्षणसामुग्री तयार केलेली आहे.

विज्ञान आणि गणित लोकप्रिय करण्याच्या क्षेत्रात डॉ. सुधाकर आगरकर यांना स्वारस्य आहे. मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यात, व्याख्याने व प्रात्यक्षिके करण्यात, तसेच रेडिओ-टेलिव्हिजनवर, तसेच वृत्तपत्रे व नियत-कालिकांतून प्रबोधनपर लेख लिहूनही त्यांना आनंद मिळत असतो. गुंतागुंतीच्या वैज्ञानिक संकल्पना, स्व-विकसित कथाकथनात्मक शैलीने ते सामान्य माणसांना सहजच समजावून देऊ शकतात. मराठी विज्ञान परिषदेचे ते तहहयात सदस्य आहेत. ही संस्था मराठीतून विज्ञानप्रसार करणारी स्वयंसेवी संस्था आहे. संस्थेतर्फे ते विज्ञान आणि गणितास लोकप्रियता मिळवून देण्याकरता अनेक कार्यक्रम आयोजित करत असतात. संस्थेची 'विज्ञानपत्रिका', स्थानिक वृत्तपत्रे, 'विज्ञानवार्ता' आणि 'दिशा' या नियतकालिकांतून त्यांनी विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी असंख्य लेख लिहिलेले आहेत.

डॉ. सुधाकर आगरकर यांना अनेक पारितोषिके आणि उत्कृष्टता प्रमाणपत्रे लाभलेली आहेत. १९७० ते १९७५ दरम्यान शिकत असताना, त्यांना भारत सरकारची राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती लाभलेली होती. विज्ञानशिक्षणातील त्यांच्या अलौकिक कार्याखातर 'मराठी विज्ञान परिषदेने' १९९२ साली त्यांचा सत्कार केला होता. १९९८-९९ मध्ये मिल्टन केनेस, यु.के. येथील मुक्त विद्यापीठात दूरशिक्षण घेण्याकरता रोटरी फाऊंडेशनची 'अँबॅस्डोरिअल स्कॉलरशिप' लाभलेली होती. उत्कृष्ट नेतृत्वाखातर २००४ साली त्यांना 'अमेरिकन बायोग्राफिकल इन्स्टिट्यूटने' सन्मानित केले होते. देशातील प्राथमिक शिक्षणात अलौकिक सेवा दिल्याखातर २००४ साली मॅरी मॅक्कर्डी इंटरनॅशनल अवार्डही त्यांना लाभलेले होते. इंटरनॅशनल युनियन ऑफ प्युअर अँड अप्लाईड केमिस्ट्रीचे फेलो म्हणून त्यांची २००५ सालीच निवड झाली. उपचारात्मक गणितातील त्यांच्या योगदानाकरता त्यांना २०११ साली संजीवराय शर्मा पारितोषिकही लाभले. विज्ञानशिक्षणातील होमी भाभा अवार्ड त्यांना २०१२ साली प्राप्त झाले.

स्वतःचे संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे डॉ. सुधाकर आगरकर यांनी अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. चार आंतरराष्ट्रीय प्रकाशनांचे ते सहयोगी-लेखक आहेत.

१. मॅथेमॅटिक्स एज्युकेशन अराऊंड द वर्ल्ड (नॅशनल कौन्सिल ऑफ टीचर्स ऑफ मॅथेमॅटिक्स, १९९९).

२. नव्या शतकातील विषयशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण (सब्जेक्ट टीचिंग अँड टीचर्स एज्युकेशन इन द न्यू सेंच्युरी, क्लुवर ऍकॅडमिक पब्लिशर्स, २०००).

३. सायन्स एज्युकेशन इन आशिया (सेन्स पब्लिशर्स, २०१०).

४. सायन्स एज्युकेशनः ए ग्लोबल पर्स्पेक्टिव्ह (नेक्स्ट जनरेशन पब्लिकेशन्स, २०१३).

उपचारात्मक बीजगणितावर त्यांनी चार पुस्तकांची एक मालिका लिहिलेली आहे. गणितात कच्चे असलेल्या विद्यार्थ्यांकरताच अभ्यासस्रोत म्हणून त्यांनी उपचारात्मक भूमितीवरही चार पुस्तकांची एक मालिका लिहिलेली आहे. शिक्षकांकरता विज्ञान-शिक्षणासाठी त्यांनी कृतीवर आधारित तीन पुस्तकांची एक मालिका लिहिली आहे. लोकप्रिय विज्ञानातील अनेक पुस्तकांचे ते सहलेखक राहिलेले आहेत. 'ए बुक ऑन सायन्स क्विझ', 'हाऊ अँड व्हाय इन स्कूल सायन्स', 'यूज ऑफ व्हेकेशन्स फॉर स्टुडंटस', 'पर्सनऍलिटी डेव्हलपमेंट अँड क्लोज लुक ऍट चायना'. डॉ. सुधाकर आगरकर यांनी तज्ज्ञपुनरीक्षित (पिअर रिव्ह्यूड) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत ५० हून अधिक लेख लिहिलेले आहेत.

शिक्षकांच्या अनेक व्यावसायिक संघटनांच्या साहाय्याने निरनिराळ्या देशांतील शिक्षक-प्रशिक्षकांत निरंतर संबंध प्रस्थापित करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. डॉ. सुधाकर आगरकर खऱ्या अर्थाने विश्वपर्यटक आहेत. निरनिराळ्या विद्यापीठांतील निरनिराळ्या संस्थांकडून त्यांना व्याख्यानांची निमंत्रणे येत असतात. राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांतून बीजभाषणे (की-नोट अऍड्रेस) आणि सारांश-भाषणे देण्याकरता त्यांना व्याख्यानांची निमंत्रणे येत असतात. त्याशिवाय शिक्षक आणि विद्यार्थ्यांकरता ते देश-विदेशांत अभ्यास-पर्यटनेही घडवून आणत असतात. या कारणांखातर, निरनिराळ्या खंडांतील ३२ हून अधिक देशांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. डेन्मार्क (१९८८), जर्मनी (१९८८), ऑस्ट्रेलिया (१९९५), सिंगापूर (१९९५, २००५, २०१०, २०११, २०१२, २०१३), रशिया (१९९६), अमेरिका (१९९८, २००१, २००२, २०१०, २०१२), इंग्लंड (१९८८-९९, २००३, २००४, २००५, २००६, २००७, २००८, २००९, २०१०, २०११, २०१३), जपान (२०००, २०१२), हॉंगकॉंग (२०००, २०१२, २०१३), फ्रान्स (२००१), माल्टा (२००२), नायजेरिया (२००२), केनया (२००२), सायप्रस (२००४), इजिप्त (२००४), जॉर्डन (२००४), चीन (२००४, २००७, २००८, २००९, २०१०, २०११, २०१२, २०१३), थायलंड (२००५, २०११), मलेशिया (२००५), कुवैत (२००६), युनायटेड अरब अमिराती (२००६, २०१४), कातार (२००६), सेशेल्स (२००६), दक्षिण आफ्रिका (२००६), ग्रीस (२००९), स्वित्झर्लंड (२००९), ओमान (२०१०), ग्वाम (२०१०), दक्षिण कोरिया (२०१०), जमैका (२०१२), इस्राएल (२०१३) आणि ब्राझील (२०१३) इत्यादी देश हे त्यातीलच एक आहेत.

संवर्धित वास्तवातून शिक्षण (लर्निंग थ्रू ऑग्मेंटेड रिऍलिटी)

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आपली आयुष्ये, माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाने (इन्फॉर्मेशन अँड कॉम्युनिकेशन टेक्नॉलॉजीने) प्रभावित झालेली आहेत. त्यातील विकासाने आपणास परस्परांशी सत्वर संवाद साधण्यास समर्थ केलेले आहे. ज्यामुळे एक 'संलग्नित समाज (कनेक्टेड सोसायटी)' उदयास आलेला आहे. माहिती आणि संवाद तंत्रज्ञानातील विकासामुळे 'कुणालाही, कुठेही आणि केंव्हाही' माहिती उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे अशा समाजास 'ज्ञान समाज (नॉलेज सोसायटी)' म्हटले जाते. माहिती आणि संवाद तंत्रज्ञानातील विकासामुळे शालेय शिक्षणही प्रभावित झालेले आहे. विजकीय शिक्षणात (ई-लर्निंगमध्ये) प्रचंड प्रमाणात अदोहित सामर्थ्ये दडलेली आहेत. अनेक विकसित देशांत फळ्याची जागा 'कुशाग्र फलकां'नी घेतलेली आहे. त्यातून शिक्षक-विद्यार्थी परस्परसंवाद सुलभ होतो. या देशांत, प्रत्येक वर्ग-खोलीत अनिवार्यतेने

एक संगणक आणि एक 'द्रवस्फटिकदर्शक (लिक्विड क्रिस्टल डिस्प्ले, एल.सी.डी.)' प्रक्षेपक असतोच असतो. विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांनाही संकेतस्थळे माहितीचे स्रोत ठरतात. शिक्षणावरील माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाच्या प्रभावाची दखल घेऊन 'नासा'ने 'भविष्यातील वर्गखोली (क्लासरूम ऑफ द फ्युचर, सी.ओ.टी.एफ.)'ची संकल्पना प्रसृत केलेली आहे. अमेरिकेच्या निरनिराळ्या भागांत प्रस्थापित झालेल्या 'भविष्यातील वर्ग-खोल्या'; उपलब्ध असलेल्या माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाच्या सुविधांचा उपयोग करून 'ज्ञानगवेषणा (नॉलेज एक्सप्लोरेशन)'च्या नव्या पद्धती विकसित करत आहेत. इंग्लंडमधील जगातील पहिल्या खुल्या विद्यापीठात, दूरशिक्षणाकरता तंत्रज्ञानाचा मुक्तहस्त वापर केला जात आहे. तेथील 'ज्ञान-माध्यम माहिती (नॉलेज मेडिया इन्फॉर्मेशन)' शाळांतील शिकण्या-शिकवण्याच्या पद्धती सुधारत आहेत. (www.kmi.open. ac.uk).




अशा अत्याधुनिक नवनवीन सुविधांच्या सर्व सामर्थ्यांचा वापर करणे, स्वतः शिकून घेऊन, इतरांनाही अवगत करून देण्यात सुधाकरराव तत्पर असतात. चंद्रपुरातील स्वतःच्या वावरानजीकच्या लहान मुलांना देश-विदेशातील आधुनिक तंत्रांचा आणि सुविधांचा ते परिचय करून देत असतात. त्यांच्यात वाचनाची आवड उत्पन्न व्हावी म्हणून ते वाचनालये स्थापन करतात. त्यांना उन्नतीचा वेध घेणारी पुस्तके उपलब्ध करून देतात. त्याकरता आवर्जून तिथे जातात. डोंबिवलीतील आपल्या घरापासून, तर चंद्रपूरनजीकच्या आपल्या वावरापर्यंत जाता-येता स्वतःची मोटार स्वतः चालवत, वर्तमान महाराष्ट्राचे दर्शन घेतात. आसपासच्या शिक्षक प्राध्यापकांशी संपर्क साधतात. संधी मिळाल्यास जागोजागी मुलांशी बोलून घेतात. त्यांच्यात विज्ञानवृत्ती जागवतात. खरे तर असा विज्ञान-शिक्षक मिळणे दुर्मीळच आहे. अलीकडेच ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या विश्वस्त समितीवर त्यांची निवड करून, या मोठ्या संस्थेस त्यांचे मार्गदर्शन अविरत मिळत राहील अशी ठोस व्यवस्थाच मंडळाने केलेली आहे. आपल्या देशातील वंचित मुलांना आधुनिक शिक्षणाचा लाभ करवून देण्याच्या त्यांच्या प्रयासांना यामुळे मोठेच सामर्थ्य लाभलेले आहे. या निमित्ताने डॉक्टर साहेबांचा हा अल्पपरिचय, त्यांच्याशी अपरिचित असलेल्यांना त्यांची नवी ओळख करून देईल, तर त्यांना ओळखत असलेल्यांना त्यांच्या अज्ञात पैलूंची माहितीही देईल असा विश्वास वाटतो.

डॉक्टर साहेबांना त्यांच्या सर्व अंगीकृत कार्यांकरता उत्तम आयुरारोग्य लाभो आणि विद्यार्थ्यांना आपापली सामर्थ्ये समृद्ध करण्याचे सर्व सोपान लाभोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

संदर्भः

१. डॉक्टर सुधाकर आगरकर
https://www.hbcse.tifr.res.in/people/former-members/sudhakar-c-agarkar

२. रासायनिक मूलद्रव्यांच्या मनोरंजक शोधकथा
https://vpmthane.org/web2/Dr%20Sudhakar%20Agarkar.html

३. डॉक्टर सुधाकर आगरकर
https://www.safehandsakola.org/noticeboard8%20Nov%202019%20KUTUH-L.pdf

४. सिंगापोर अभ्यास सहल - संजय टिकरिया
http://sanjaytikariya.blogspot.in/2010/12/gsgoogleaddadsenseserviceca-pub.html

**- नरेंद्र गोळे**
१०४, दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ,
छेदगल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# चलत मुसाफिर मोह लिया रे... ?

*प्रसिद्ध गीतकार शैलेंद्र यांच्या काव्यप्रतिभेवर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ साहित्यिक प्रमोद बापट यांचा लेख - संपादक*

चलतपटांच्या मुसाफिरांना मोहिनी पाडणारे अनेक घटक आहेत. अभिनेते-अभिनेत्री यांच्या प्रतिमा मनात साठविल्या जातात. कथा-संवादाचीही स्मरणे ताजी असतात. पण वाटेवर सतत सोबत करीत असतात ती गीतं.

भारतीय मनांवर सिने-संगीताचा अगदी जिवाभावाचा पगडा आहे. त्याचे श्रेय मात्र मूळ भारतीय मनाच्या ठेवणीलाच द्यायला हवे. अगदी वेदवाक्यांपासून श्रुतिवचने, लोकोक्ती, संतोक्ती भारतीय माणसाच्या बोली व्यवहारात महत्त्वाचे स्थान पटकावून बसल्या आहेत. म्हणूनच आपल्या नाटका-सिनेमात संगीताला, गीतांना स्थान मिळाले. आणि नेमके संतोक्तीसारखेच स्थान सिने-गीतांनाही मिळाले.

ती प्रतिष्ठा दृढ करणारे, वाढविणारे अनेक गीतकार सांगता येतील. त्यांमध्ये शैलेंद्र यांचे स्थान खूप महत्त्वाचे स्थान आहे, मोलाचा वाटा आहे. 'चलत मुसाफिर मोह लिया रे...' असं त्यांच्याच शब्दांत त्यांचे गौरवाने स्मरण करण्यासाठी विशेष निमित्त आहे ते सुरू झालेल्या त्यांच्या जन्मशताब्दीचे.

मूळ बिहारमधील आँरा जिल्ह्यातील शैलेंद्र कुटुंब वडील केसरीलाल यांच्या सैनिकी विभागात ठेकेदारीच्या नोकरीसाठी रावळपिंडीत स्थायिक झाले. तिथेच दिनांक ३० ऑगस्ट १९२३ या दिवशी शंकरदास यांचा जन्म झाला, जे पुढे शैलेंद्र या नावाने गीतकार म्हणून प्रसिद्ध झाले. पुढे भारताच्या दुर्दैवी विभाजनाआधीच काही कौटुंबिक कारणांसाठी ते कुटुंब मथुरेत स्थायिक झाले. कुटुंबाची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी शैलेंद्र यांना




शिक्षण सोडून नोकरी शोधावी लागली आणि अशाच नोकरीच्या निमित्ताने त्यांचा मुंबईत प्रवेश झाला. मुंबईतील रेल्वेच्या माटुंगा येथील कारखान्यात ते वेल्डिंग खात्यात नोकरी करू लागले. कवितेची सोबत होतीच.

फाळणीच्या धक्क्याने अस्वस्थ झालेलं मन कवितेतून व्यक्त होत होतं. रॉयल ऑपेरा हाऊस समोर एका जलशात कवी शैलेंद्र उभे राहिले आणि 'जलता हैं पंजाब..' ही आपली कविता तिथे प्रस्तुत करीत होते. मातृभूमीपासून दुरावलेल्या सिंध आणि पंजाबपुत्रांचे ते आक्रंदन! त्यात त्यांची जन्मनगरी रावळपिंडी दुरावल्याचीही वेदना चरचरत जात होती. सारे श्रोते त्यांच्या शब्दांतील वेदना, आक्रोश यांच्याशी तद्रूप होऊन ऐकत होती. त्यातच एक कलासक्त तरुण भारावून जात कविला पहात राहिला, ऐकत राहिला. जलसा संपला तरी निघाला नाही. कविची वाट बघत तिष्ठत राहिला. कवी मोकळा दिसताच त्याला भेटला आणि त्याच्यासमोर प्रस्तावच ठेवला... माझ्या चित्रपटासाठी गीत लिहिशील? कवी पहातच राहिला. आपली कविता, आपले शब्द कुणी विकत मागतोय हेच त्याला सहन

झालं नाही. माझी कविता विक्रीसाठी नाही, आणि दुसऱ्या कुणाच्या कथेसाठी, चित्रपटासाठी लिहावं असं माझं काही अडलं नाही. असं म्हणून कवी झटक्यात निघालाही. तो निळ्या डोळ्यांचा भावुक तरुण चकित होऊन पहात राहिला. त्याने इतकंच केलं.. कविच्या हाती आपलं कार्ड ठेवलं आणि सुचवलं 'हे असू द्या तुमच्याजवळ. कधी पुनर्विचार केलात तर कामी येईल' ते कार्ड कविच्या खिशात राहिलं आणि दुर्दैवाने कविच्या खिशात जेव्हा काहीच उरलं नाही तेव्हा निरूपायाने कवी त्या कार्डावरील पत्त्यावर जाऊन त्या निळ्याभोर डोळ्यांच्या तरुणाला भेटला आणि चित्रगीतांचा एक भाग्ययोग घडून आला. एका शब्दयात्रेचा शुभारंभ झाला. अर्थसुंदर शब्दांची बरसात सुरू झाली. राज कपूर आपल्या निळ्याभोर डोळ्यांनी समाधानाने हसला. राज कपूर फिल्म्ससाठी गीतकार शैलेंद्र ही एक अनिवार्यता बनून गेली.

पुढे शैलेंद्र केवळ राज कपूरच नव्हे, तर चित्रपट-सृष्टीतील सर्वच मोठ्या निर्मात्यांना हवेहवेसे वाटू लागले. त्यांनी लिहिलेली गीतं सर्वत्र वाजू लागली, गाजू लागली.

भारतात तसं तर सर्वच वैचारिक क्षेत्रात पण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या साहित्य, संगीत, नाट्य, चित्रपट अशा कलाक्षेत्रात जे लोकांच्या मनांवर अधिराज्य गाजवतंय, कला म्हणून सरस आहे अशा कलाप्रस्तुतीला आणि प्रस्तुतकर्त्यालाही साम्यवादी ठरविण्याचा प्रघात आहे. ते एक कारस्थानच आहे. म्हणजे कुणाच्याही साहित्यात करुणा, वंचितांविषयी कळवळा आढळला की लगेच त्याला मार्क्सवादी ठरविले जाते. वस्तुत: असा कळवळा, उन्नयनासाठी हाक देणं, हात देणं या तर अत्यंत स्वाभाविक मानवी प्रेरणा आहेत, अभिव्यक्ती आहेत. आणि साम्यवादाची तर स्वाभाविक प्रेरणा संघर्षाची, विद्रोहाची. मग हे दोन्ही एक कसे म्हणावे? दु:स्थितीविषयी करुणा जशी स्वाभाविक आहे तसा संघर्ष म्हणता येईल का? उन्नयनासाठी कळवळा सहज म्हणता येतो तसा विद्रोह आहे का? सर्व जीवन-व्यवहाराचीच मांडणी दोन वर्ग आणि तेही परस्पर विरोधी आणि त्यातही एक वर्ग हा दुसऱ्या वर्गाचे नित्य शोषणच करीत असतो असे कल्पून त्या दोघांमधील संघर्ष फुलवत ठेवून एकमेकांकडे शोषक आणि शोषितांच्या भूमिका फिरवत ठेवण्यासाठी विद्रोहाची पेरणी करत राहण्याने जगातील सर्व घटकांचं दु:ख कसं संपुष्टात यावं? आणखी राजकीय सत्ता हे टोकही असतंच.

ती विचारधारा म्हणून जे असेल ते असो. त्याला विरोध करणे हे या लेखनाचे प्रयोजन नाही. पण अशा स्वाभाविक भारतीय, मानवी प्रेरणा ज्या प्रतिभावंताच्या रचनांमध्ये दिसून येतात त्यांना साम्यवादाच्या पिंजऱ्यात कोंडणं मला अन्यायाचं, अनुचित वाटतं.

शैलेंद्र यांनाही याच पिंजऱ्यात कोंडण्याचे प्रयत्न त्यांच्या जीवनकाळातही झाले तसेच आजही सुरू आहेत. एक विलक्षण योग असा की, ज्या शैलेंद्र यांनी आपला केवळ ३२ कविता आणि जनगीतांचा एकमेव काव्यसंग्रह 'न्योता और चुनौती' ज्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अर्पण केला आहे त्या अण्णाभाऊंनाही वर्षानुवर्षे ही साम्यवादी कैद सहन करावी लागते आहे!

*आपल्या अर्पण-पत्रिकेत शैलेंद्रजींनी लिहिलं होतं:*

*समर्पण*

*मराठी के कामगार साहित्यिक अण्णाभाऊ साठे को*

*दो शब्द -*

'पिछले कई वर्षों से बिखरी हुई इन रचनाओं को एकत्रित करने का उद्देश्य कि रिकार्ड रह सके। ये वर्ष और इनकी रचनाएँ साहित्य और कला के प्रति मेरा दृष्टिकोण निश्चित करने में सहायक सिद्ध हुए हैं। इसलिए भी व्यक्तिगत रूप से यह संग्रह मेरे लिए महत्त्वपूर्ण है।

ज़िन्दगी और जन–आन्दोलन की देन ये रचनाएँ पाठकों को बुरी तो नहीं लगेंगी, ऐसा मेरा विश्वास है ।'

**– मई, १९५५ शंकर शैलेन्द्र**

वंचितांच्या जीवनात सन्मान आणि त्या योगे जगात मांगल्याची पेरणी करण्याच्या प्रेरणेने आपला व्यापक साहित्यसंभार निर्माण करणारे अण्णाभाऊ आणि स्वतंत्र कवितेसह लोकप्रिय मानल्या गेलेल्या चित्रपटगीतांच्या माध्यमातूनही तोच उद्देश सार्थक करणारे शैलेंद्र यांच्या भाषा वेगळ्या, पण अभिव्यक्तीची प्रयोजने एकच होती. त्यामुळेच दोनच वर्षांपूर्वी जन्मशताब्दी साजरी झालेले अण्णाभाऊ आणि जन्मशताब्दी सुरू झालेले शैलेंद्र.. दोघेही स्मरणीय साहित्यकार.

या लेखाच्या शीर्षकातील गीतपंक्ती शैलेंद्र यांचीच. त्यांनीच निर्माण केलेल्या 'तिसरी कसम' चित्रपटातील हे अतिशय गाजलेलं गीत. तसं ते लोकभाषेतील गाणं. म्हटल्यास केवळ विरंगुळ्यासाठी आलेलं, गंमतीदार वर्णन करणारं सामान्य गाडीवानांनी आनंद घेत समुहस्वर मिळवत गायलेलं गीत. त्याचे चित्रिकरणही नायक राज कपूर यांच्यावर न करता किशन धवन या लहान भूमिकेतील कलावंतावर केलं आहे.

पण याच गीताकडे रूपक म्हणून पाहता ते काही अधिक सांगू शकते.. सांगू लागते.

पिंजऱ्यातील मैनेने लोभावलेल्या वाटसरूला तीच मैना पिंजऱ्याबाहेर जाऊन ज्या लीला दाखवते त्यांचे वर्णन तीनही अंतऱ्यात आले आहे. पिंजऱ्यातील ही मैना बाहेर येऊन हलवायाच्या मिठाईचा, विणकराच्या कापडाचा आणि पानवाल्याच्या विड्याचा आस्वाद घेते पण पिंजरा कायमचा सोडत नाही. कदाचित त्यामुळेच ती सुरक्षित असेल. तिला जाण्याची वाट आहे पण तिला यावेच लागते. तिची ती अपरिहार्यता आहे.

साम्यवादाचा हा जणू पिंजरा उभा केला आहे. त्यात आपल्या लीलांनी रंजन करणाऱ्या मैनांना कोंडले आहे. तुमचे तुमचे जीवनास्वाद तुम्ही चाखू शकाल; पण जर या पिंजऱ्यात रहाणे स्वीकाराल तरच! असा दंडक त्यांना सांगण्यात आला आहे. 'तरच तुम्ही सुरक्षित रहाल' असा दिलासा त्यांना दिला आहे. 'तरच तुम्ही वाटसरुंचे लाडके रहाल. लोकप्रिय व्हाल. पुरस्कार मिळवाल. लौकिक मिळवाल' असे आश्वासन त्यांना दिले आहे. 'हा पिंजरा हीच तुमची मुक्ती आहे, मुक्तीचं सुरक्षित साधन आहे. पण हा पिंजरा अमान्य कराल तर तुमचं अस्तित्वच संकटात येईल. लोकप्रिय नव्हे तर लोकापवाद निर्माण होतील. अभिव्यक्ती अडविण्यात येईल. आमचा पिंजरा मान्य कराल तरच तुमच्या अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य अबाधित राहील' अशी तंबी त्यांना दिली आहे.

कवी शैलेंद्र जणू रुपकातून आपली कैफियत मांडताहेत. त्यांच्याच कवितांच्या काही ओळी आठवतात:

झूठे सपनों के छल से निकल
चलती सड़कों पर आ !
अपनों से न रह यों दूर–दूर
आ क़दम से क़दम मिला !
तू औ' मैं हम जैसे अनगिन
इक बार अगर मिल जाएँ,
तोपओं के मुँह फिर जाएँ,
जुल्म के सिंहासन हिल जाएँ,
ओ, जीते जी जलने वाले,
अन्दर भी आग जला !

भगतसिंह ! इस बार न लेना काया भारतवासी की,
देशभक्ति के लिए आज भी सज़ा मिलेगी फाँसी की !
यदि जनता की बात करोगे, तुम गद्दार कहाओगे--
बम्ब सम्ब की छोड़ो, भाषण दिया कि पकड़े जाओगे!
निकला है कानून नया, चुटकी बजते बँध जाओगे,

---

जीवनात जोखीम घेण्यास कधीही घाबरू नका; जर तुम्ही जिंकलात किंवा हरलात तर तुम्ही शिकाल.

न्याय अदालत की मत पूछो, सीधे मुक्ति पाओगे,
काँग्रेस का हुक्म; ज़रूरत क्या वारंट तलाशी की!
जिनके सीने में सुइयों–सा गड़ता है दर्द विवशता का,
जिनके घर में घुस बैठा है अंधा राक्षस परवशता का,
जो दुनिया भर का बोझ उठाए रंजोग़म से लड़ते हैं,
जो अपनी राहें आप बना पर्वत की चोटी चढ़ते हैं,
कवि उनका है, कविता उनकी!

हा कवी आजीवन लिहीत राहिला. स्वतःच्या जातीचा, वर्णाचा त्याने कधीही उल्लेख केला नाही. शब्दात विखार येऊ दिला नाही. तो गेल्यावर त्याच्या मुलाने प्रकाशित केलेल्या पुस्तकातून त्याची तथाकथित उपेक्षित जात समाजाला समजली. संत रोहिदासां नंतर त्या समाजातून आलेला, तशाच उमाळ्याने, कळवळ्याने लिहिता माणूस हाच अशी नवी ओळख त्यानंतर स्थापित झाली.

अशा कविच्या जन्मशताब्दीचा शुभारंभ सुरू झाला आहे.

आपण आतातरी त्याला पिंजऱ्यातून पूर्ण मुक्त करणार का? त्याला, अण्णाभाऊंना आणि अशा अनेकानेक प्रतिभावंतांना कोंडणारे हे 'दिखावू पिंजरे' दृष्टीआड करायला हवेत.

कवी शैलेंद्र. शतायु शैलेंद्र यांना विनम्र अभिवादन..

**– प्रमोद वसंत बापट**
०१, प्राजक्त, बी – ४, अशोकवन,
बोरिवली पूर्व, मुंबई : ४०००६६
संपर्क क्रमांक : ९८२१९७९८७१

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*०२२-२५४२ ६२७०*

(पृष्ठ क्र. २ वरून – **संपादकीय**)

प्रसिद्ध होत नाहीत. त्यांच्या कामाचे महत्त्व मात्र खूप असते. त्यांनी शोधलेल्या तत्त्वांचा आणि त्यांनी निर्माण केलेल्या यंत्रांचा आपण नियमितपणे वापर करीत असतो. अशा व्यक्तींची माहिती देण्याचा प्रयत्न या मालिकेत केला होता. यासाठी सूत्रधार प्रत्यक्ष त्या माणसाच्या गावी जाऊन त्याने नेमके काय काम केले हे पूर्णपणे सांगतो. बीबीसीचा चमू या सगळ्या बाबींचे सुंदर चित्रीकरण करतो. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला विज्ञानाचे तत्त्व तर समजतेच, त्याचबरोबर आपण रोज ज्या वस्तू वापरतो त्या कशा चालतात याचे ज्ञान देखील त्यांना होते. उदाहरणार्थ, आपल्या घरातील मायक्रोवेव्ह ओव्हन, ओटीजी ही यंत्रे कोणी विकसित केली आणि ती कोणत्या तत्त्वावर चालतात हे मला एका कार्यक्रमात पाहता आले. अशा अनेक वस्तू तंत्रज्ञांनी बनवून आपल्याला उपलब्ध करून दिलेल्या आहेत त्यांच्या स्मृतींना उजाळा देऊन त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा हा कार्यक्रम खूपच चांगला आहे असे मला वाटते.

बीबीसी दर तासाला बातम्या प्रसारित करते. या बातम्यांची आधी शहानिशा केली जाते. त्यामुळे बीबीसी रेडिओ, तसेच बीबीसी दूरचित्रवाणी वाहिनीवर प्रसारित होणाऱ्या बातम्यांची विश्वासार्हता खूपच जास्त असते. त्याचबरोबर त्यांचे बातमीदार जगभर विखुरलेले आहेत. त्यांच्याकडून अगदी ताज्या घडामोडींची माहिती केंद्रीय कार्यालयाकडे येत असते. त्यामुळे आपल्याला नुकत्याच घडलेल्या घडामोडींची माहिती मिळते. बीबीसीने मागील १०० वर्षे चांगले काम केले आहे. या संस्थेचे पुढील शतक देखील असेच भरभराटीचे जाईल याची मला खात्री वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**गुरुपौर्णिमा –**

दि. १३ जुलै २०२२ रोजी डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभागात गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

इ. ५ वी च्या वर्गावर्गांतून गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. वर्गशिक्षकांनी गुरुपौर्णिमेची माहिती व महत्त्व सांगितले.

इ. ६ वी च्या कार्यक्रमाला सौ. साधना जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मुलांचा वयोगट लक्षात घेऊन गुरुपौर्णिमेची माहिती गोष्टीतून पटवून दिली.

इ. ७ वी– मान. मुख्याध्यापिका सौ. अडसुळे यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ७ वी अ, ब च्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. सौ. तातळे व श्री. देशमुख यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले.

इ. ८ वी च्या वर्गात विद्यार्थ्यांनी सर्व विषय–शिक्षकांचे औक्षण करून भारतीय परंपरेचा वारसा जपून गुरुपौर्णिमा साजरी केली.

इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. सिद्धेश दातार प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना गुरुवंदनाचे महत्त्व सांगितले.

सौ. नंदिनी गोरे यांनी इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.

**आंतरराष्ट्रीय योग दिवस –**

२१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. घंटाळी योगविद्या मंडळाच्या सौ. मंजिरी मराठे व त्यांची टीम यांनी विद्यालंकार हॉलमध्ये इ. ७ वी, व ९ वी च्या विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले.

**व्याख्यान**

मंगळवार दि. २६/७/२२ रोजी, 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर मान. डॉ. सुधाकर आगरकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास प्राथमिक व माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

सदर व्याख्यानातून मान. डॉ. आगरकर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्पष्ट करून देताना भारतीय शिक्षण पद्धतीची पार्श्वभूमी, सद्य परिस्थिती आणि नवीन शिक्षण प्रणालीची गरज इ. बाबी स्पष्ट केल्या.

**कार्यशाळा**

दि. २५/७/२२ रोजी इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण दक्षता मंच यांच्यावतीने गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. इ. ७ वी अ, ब, क मधील एकूण ४० विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग होता. मूर्तिकार सौ. सुवर्णा बगे यांनी मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले.

दि. २०/०८/२२ रोजी इ. ७ वी अ,ब,क मधील ४० विद्यार्थ्यांना पर्यावरण म्हणजे काय? त्यासाठीच्या उपाययोजना याबद्दल माहिती सांगितली. श्री. देशमुख यांचे सहकार्य लाभले.

दि. ६/८/२२ शनिवार रोजी ''निपुण भारत अभियान अंतर्गत शिक्षण परिषद मार्गदर्शन शिबिर'' श्री माँ बालनिकेतन विद्यालय, ठाणे (प) येथे स. १० ते ३ या कालावधीत आयोजित केले होते.

त्यात सौ. सुचिता शेलार, सौ. आशालता गांगुर्डे, सौ. मानसी भोईर, सौ. प्रियांका सावंत, सौ. सुवर्णा चव्हाण या शिक्षिका सहभागी झाल्या.

**शालाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण –**

दि. ५ जुलै २०२२ ते २५ जुलै २०२२ या कालावधीत शालाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षणात सौ. सुचिता शेलार, सौ. मानसी भोईर सौ. प्रियांका सावंत, सौ. वर्षा ठिंगळे, श्री. मुकुंद देशमुख, श्री. संजय दिघे, सौ. सुप्रिया बोरूळकर, सौ. रुणाली पोटे, सौ. ज्योती केदारे, सौ. सायली माने हे शिक्षक सहभागी होते.

**रक्षा पत्र**

सोमवार दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी रोटरी क्लब ऑफ ठाणे तर्फे रक्षाबंधनाचे औचित्य साधून 'रक्षापत्र' स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये ५ ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सैनिक बांधवांना रक्षा-बंधनाच्या शुभेच्छा देणारे पत्र लिहिले.

५ ते १० वी च्या प्रत्येक वर्गातून १५ विद्यार्थ्यांना उत्तम पत्रलेखनासाठी मेडल व प्रशस्तिपत्रक स्वरूपात बक्षीस प्राप्त झाले.

**लोकमान्य टिळक पुण्यतिथी –**

सोमवार दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी टिळक पुण्यतिथी कार्यक्रम साजरा केला. सौ. यामिनी धनगर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी ५वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'ध्यानधारणा' हा कार्यक्रम घेतला.

**हस्तलिखिते व भित्तीपत्रिका**

सालाबादप्रमाणे याही वर्षी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून हस्तलिखिते व भित्तीपत्रिका तयार करण्यात आल्या.

**हस्तलिखिते – विषय**

इ. ५वी – भारतीय स्वातंत्र्यसंग्राम काळातील थोर समाजसुधारक.

इ. ६ वी, ८ वी व १० वी – सन १९०५ ते १९४७ पर्यंतच्या कालखंडात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या चळवळी व विविध घटना.

इ. सातवी, नववी – सन १९४७ पासून २०२२ पर्यंतच्या पंतप्रधानांची कारकीर्द

**भित्तीपत्रिका विषय –**

मराठी – आविष्कार – लोकशाहिर अण्णाभाऊ साठे

हिंदी – नवनीत – लता मंगेशकर

इंग्रजी – Buds and flowers - 15th President of India - Draupadi Murmu

विज्ञान – १) आयुर्वेदिक वनस्पती

२) कोरोना विषाणू आणि त्यावरील प्रतिबंधात्मक लस

विद्या प्रसारक मंडळाचे माननीय कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी हस्तलिखिते व भित्तीपत्रिकांचे प्रकाशन केले.

**राष्ट्रीय बालविज्ञान परिषद – २०२२**

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद अंतर्गत ७ प्रकल्पांची जिल्हा स्तरावर निवड झाली.

**लहान गट –** १) चिलटांचा अभ्यास २) रानभाज्या रानातून घरात ३) चित्रांग भुंगेरा, नैसर्गिक औषधं ४) कारखान्यातून बाहेर पडणारा धूर/पर्यावरण परिणाम

**मोठा गट –** १) प्लॅस्टिक कंटेनरला पर्यायी व्यवस्था २) खाडीशेजारील मातीतील सूक्ष्मजीवांचा अभ्यास ३) कालबाह्य औषधांचा अभ्यास.

* ठाणे जिल्हा विज्ञान प्रदर्शनात एक प्रकल्प पाठवला. १) वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरावर निर्बंध.
* भारत विकास परिषद – समूहगीत स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त.

* भारत विकास परिषद – प्रश्नमंजुषा स्पर्धा. लहान गट व मोठा गट सहभाग.
* मराठी विभाग परिषद – एकांकिका स्पर्धा, एकांकीचे नाव – छोटे अंतराळवीर

**स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव**

दि. ८ ऑगस्ट २०२२ ते १२ ऑगस्ट २०२२ दरम्यान भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अनुषंगाने ''हर घर तिरंगा'' उपक्रमाअंतर्गत

स्वातंत्र्यगान गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व, चित्रकला, वेशभूषा, पोस्टर, रांगोळी, भेटकार्ड, घोषवाक्य, देशभक्तीपर गीत गायन, समूह गान इ. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'प्रभात फेरी'ही काढण्यात आली.

अशा तऱ्हेने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अतिशय उत्साहाने आनंदाने राबविण्यात आला. इ. ५ ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**मातृदिन**

दि. २६ ऑगस्ट २०२२ रोजी दुपार विभागात मातृदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्तोत्र म्हणून मातेचे पूजन केले. सौ. सुषमा बोऱ्हाडे यांनी मातृदिनाची माहिती व गोष्ट सांगितली.

**सायबर सुरक्षा –**

दि. २६ ऑगस्ट २०२२ रोजी सायबर सुरक्षा या विषयावर ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम घेण्यात आला.

**स्काऊट – गाईड विभाग**

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम –**

* दि. १०/८/२२ रोजी इ. ६ वी ब, क, ७ वी ब, क तसेच ८ वी ब, क च्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन केले. २५० विद्यार्थी सहभागी झाले.
* दि. ११/८/२२ रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधून वृक्षांबद्दल अनोखे प्रेम व्यक्त करून झाडांना राखी बांधली.
* दि. ८/८/२२ रोजी कोल्हापूर रेजीमेन्ट येथील सैनिकांना विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या १००० राख्या पाठविण्यात आल्या.
* दि. ११/८/२२ रोजी दरवर्षीप्रमाणे ठाण्यातील शहर वाहतुक शाखा नौपाडा येथे जाऊन वाहतुक पोलिस, वरिष्ठ पोलिस निरिक्षक नौपाडा, मान. श्री. सुरेश खेडेकर व सहा. पोलिस निरिक्षक श्री. दीपक जोगदंड व त्यांचे सहकारी यांना विद्यार्थ्यांनी राख्या बांधल्या.
* दि. २५/०८/२२ रोजी इ. ५ वी आणि ७ वी च्या विद्यार्थ्यांनी कागदी पिशव्या तयार केल्या. तयार पिशव्या गणेशोत्सवात विद्यार्थ्यांनी सार्वजनिक गणेशमंडळांना, तसेच घरगुती गणपती येथे देण्यात आल्या.

वरील सर्व उपक्रम स्काऊट – गाईड शिक्षक तसेच मान. मुख्याध्यापिका यांच्या मार्गदर्शनाने पार पडले.

**आयुष्यमान भारत प्रशिक्षण**

(School health and wellness programme)

दि. २३/०८/२२ ते २६/०८/२२ या कालावधीत भारत सरकारने आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित केले होते. सदर प्रशिक्षणास मान. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे, श्री. अविनाश कोल्हे आणि सौ. सुप्रिया बोरूळकर उपस्थित होते. त्यांची शालेय स्तरावर 'आरोग्यवर्धिनी दूत' म्हणून निवड करण्यात आली. SCERT कडून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

### शिक्षक दिन

गुरुवार दि. २२/९/२२ रोजी आपल्या शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात पार पडला. ९ वी आणि १० वी चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

५ वी ते ८ वी च्या वर्गावर ९ वी, १० वी च्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम उत्तमरित्या केले. कार्यक्रमास समारोप प्रसंगी शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत मांडले.

### स्वच्छता अमृत महोत्सव

ठाणे महानगरपालिका आयोजित ''स्वच्छता अमृत महोत्सव'' निमित्त चित्रकला, तसेच 'टाकाऊ पासून टिकाऊ' या स्पर्धाचे आयोजन केले होते.

स्पर्धेतून निवड झालेली चित्रे व ४ प्रकल्प यांचे सादरीकरण दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहात झाले.

### हिंदी दिन

हिंदी दिन सप्ताह अंतर्गत दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी शाळेत मोठ्या उत्साहात 'हिंदी दिवस' साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. मिनाक्षी मलिये-कुमावत उपस्थित होत्या. इ. ८ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांनी हिंदी कविता वाचन, हिंदी देशभक्ती गीते, हास्यविनोद, संत कबीर, संत तुलसी, संत रहिम यांच्या दोह्यांचे सादरीकरण केले. इ. १० वी क च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे हिंदी विषयाचे, तसेच हिंदी दिनाचे महत्त्व पटवून दिले.

### प्राथमिक शिक्षक वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण

SCERT तर्फे दि. १ जून ते ३१ जुलै २०२२ या कालावधीत १२ वर्षे तसेच २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या पुढील शिक्षकांचे वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाले.

| वरिष्ठ श्रेणी | निवड श्रेणी |
|---|---|
| १) सौ. अश्विनी रोंगटे | १) सौ. कल्पना बोरवणकर |
| २) श्री. विलास कोळी | २) सौ. उज्ज्वला धोत्रे |
| ३) श्री. रणजित शिंदे | ३) सौ. ज्योती केदारे |
| | ४) सौ. साधना कारंडे-जोशी |
| | ५) सौ. नेत्रा सोनावणे |
| | ६) सौ. सुचिता शेलार |
| | ७) सौ. आशालता गांगुर्डे |
| | ८) सौ. प्रियांका सावंत |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**२५ ऑगस्ट २०२२ –** पोळा, मातृदिन, श्रावण अमावस्या, शेतकरी बांधव 'पोळा' म्हणून साजरा करतात. शेतकऱ्याला मदत करणारा प्राणी म्हणजे बैल. त्याची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो.

याच दिवशी मातृदिनही साजरा करण्यात येतो. आपल्या आईविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस शिक्षकांनी या दोन्ही विषयींची माहिती मुलांना परिपाठाच्या तासिकेला दिली.

**२९ ऑगस्ट २०२२ – गणपती** – गणपतीबाप्पा मुलांचा आवडता. त्याचा सण उत्साहात साजरा केला.

गणपतीची मूर्ती शाडूची असावी, तसेच आजूबाजूची आरास पर्यावरणपूरक असावी याची माहिती शिक्षकांनी मुलांना या उत्सवाच्या काही दिवस आधीच दिली होती.

शाळेत आणलेली मूर्ती शाडूची होती तर कागदाची फुले, चादर याचा उपयोग करून शिक्षकांनी सुंदर आरास केली होती. नर्सरी व ज्यूनियर के. जी. च्या मुलांनी टाळ गजराच्या तालात गणपती बाप्पा आणला. श्लोक, स्तोत्र म्हणून मुलांनी प्रार्थना केली. शिक्षकांनी पूजा व आरती केली. गणपतीची गाणी मुलांनी गायली.

सिनीयरच्या मुलांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणपती विसर्जन केले याबद्दल शिक्षकांनी माहिती दिली.

- नर्सरीच्या मुलांनी – मोदकाचे चित्र रंगवले.
- ज्यूनियरच्या मुलांनी – चिकणमातीचा मोदक तयार केला.
- सिनीयरच्या मुलांनी – चिकणमातीचा गणपती तयार केला. तसेच गणपतीचे चित्र कापून चित्रकलेच्या वहीत चिकटवून आजूबाजूला सजावट केली. या निमित्ताने तळलेल्या मोदकाचा प्रसाद मुलांना देण्यात आला.

**२३ सप्टेंबर २०२२ – (नर्सरी – Fruit Day)**

नर्सरीच्या मुलांनी या दिवशी एका फळाचा वेष केला होता व त्या फळाविषयी २/३ वाक्यात बोलायचे असा उपक्रम घेतला गेला. त्यात मुलांनी उत्साहाने भाग घेतला.

**२३ सप्टेंबर २०२२ – खळ मिसळणे – (**Starch Mixing**)**

कणकेची खळ करून त्यात खेळणे हा मुलांचा आवडता खेळ.

**२७ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२२ – नवरात्र**

या दरम्यान नवरात्र उत्सव साजरा केला गेला. महिषासुरमर्दिनी, माँ दुर्गा, सरस्वती या देवीच्या विविध रूपांची माहिती चित्रांसहित मुलांना देण्यात आली. रोज विविध रंगांचे कपडे मुलांनी परिधान केले होते. नवरात्राची माहिती शिक्षकांनी दिली. देवीचे श्लोक म्हणून शिक्षकांबरोबर मुलांनी देवीची पूजा केली.

या दरम्यान खेळले जाणारे खेळ जसे गरबा, भोंडला, दांडिया याची माहिती मुलांना देण्यात आली. ३० सप्टेंबरला शाळेत नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांचा भोंडला झाला. चार विविध प्रकारची चॉकलेटस् मुलांना खिरापत म्हणून देण्यात आली. देवीची चित्रं, दांडिया यासारख्या सणाशी निगडित चित्रांनी व्हरांडा व वर्गांची सजावट केली गेली.

- नर्सरी – आपट्याचं पान, झेंडूच्या फुलाचे स्टेन्सिल रंगवले.
- ज्यूनियर – दांडियाचे चित्र रंगवले.
- सिनीयर – प्रत्येक मुलाने १ झेंडू फुल व १ आंब्याचे पान आणले व शिक्षकांच्या सहाय्याने सुंदर तोरणं तयार करून सर्व वर्गांच्या दरवाज्यावर लावली.

**४ ऑक्टोबर २०२२ – दसरा**

नवरात्रीचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा या दिवसाचे महत्त्व. या दिवशी देण्यात येणारे आपट्याचे पान, सरस्वती पूजन याची माहिती शिक्षकांनी दिली. मुलांनी शिक्षकांच्या मदतीने सरस्वती पूजन केले.

**१ ऑक्टोबर २०२२ – पालक सभा**

- नर्सरी व ज्यूनियर – १०:३० ते ११:००.
- सिनीयर – १२:०० वाजता.

या सत्रातील शेवटची पालक सभा १ ऑक्टोबर २०२२ रोजी घेण्यात आली. या सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या निरीक्षणासंबंधी (I Observation) पालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. पालकांच्या शंकांचे निरसन करून ही सभा संपली.

**प्रथम निरीक्षण (**I Observation**) : ६ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर**

या काळात मुलांचे विविध विषयां अंतर्गत शिकवलेल्या संकल्पनांवर आधारित निरीक्षण घेण्यात आले. काही संकल्पना कार्यपत्रिका (worksheets) देऊन, तर काही तोंडी प्रश्नांच्या आधारे मुलांचे निरीक्षण नोंदवण्यात आले. याचा निकाल पुढील सत्रात पालकांना देण्यात येईल.

ज्यादिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही, तो दिवस फुकट गेला असं समजा!

**दिवाळी – १९ ऑक्टोबर**

दिवाळी वर्षातील सर्वात मोठा सण 'दिव्यांचा सण'. दिवाळीतील वसुबारसेपासून ते भाऊबीजेपर्यंत सर्व दिवसांचे महत्त्व शिक्षकांनी सांगितले. पणत्या, आकाश कंदील, रांगोळ्या, फटाके या सर्व चित्रांनी पूर्ण के. जी. विभाग सजवण्यात आला होता. मुलांनी नवीन कपडे घातले होते. दिवाळी सणासंबंधी मुलांनी गाणी गायली व त्यावर नृत्याचा आनंद लुटला. बेसन लाडू व चकली असा खाऊ मुलांना दिला.

- नर्सरी – आकाश कंदील स्टेन्सील रंगवणे.
- ज्यूनियर के. जी. – मातीच्या पणत्या रंगवणे.
- सिनीयर के. जी. – रांगोळीचे चित्र रंगवणे.

**सुरक्षा उपाय** (safety measures) –

- चांगला व वाईट स्पर्श (Good and Bad touch).
- नर्सरी व सिनीयर के. जी. – १७ ऑक्टोबर
- ज्यूनियर के. जी. – १८ ऑक्टोबर.

परक्या माणसांपासून सावधानता, तसेच चांगल्या व वाईट स्पर्शाबद्दलची कल्पना शिक्षकांनी मुलांना दिली.

अशारितीने २०२२ या वर्षाच्या पहिल्या सत्राची सांगता झाली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**पठण स्पर्धा ( इयत्ता १ली आणि २री )**

सौ. ए. के. जोशी शाळेत इयत्ता १ली आणि २री च्या विद्यार्थ्यांसाठी २६ ऑगस्ट २०२२ रोजी इंग्रजी भाषेत पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या भाषेतून कविता, तसेच गाण्यांचे पठण केले.

तसेच तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांकरता इंग्रजी वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन २६ ऑगस्ट २०२२ रोजी केले गेले. स्पर्धेकरता विषय खालील प्रमाणे देण्यात आले होते.

**इयत्ता ३री – (कोणताही एक)**

१) आपला परिसर
२) सणांचे महत्त्व
३) माझा आवडता ऋतू

**इयत्ता ४थी – (कोणताही एक)**

१) झाडांचे महत्त्व
२) शैक्षणिक विभागातील तंत्रज्ञानाचे योगदान
३) माझा आवडता खेळ

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली.

**IPM–२०२१–२०२२ परीक्षेचा अंतिम निकाल**

खालील विद्यार्थी संपूर्ण देशभरातून गुणवत्ता यादीत आले आहेत.

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कु. क्रिशय दीपक गाला | २री | ३० वा |
| २ | कु. अस्मी योगेश कानडे | २री | १०७ वा |
| ३ | कु. विहान वर्धन ताम्हणकर | २री | १०७ वा |
| ४ | कु. मिहिका वैभव काळे | २री | ११६ वा |
| ५ | कु. स्वयम राहुल मालंडकर | २री | १२७ वा |
| ६ | कु. विधी विजय उतेकर | २री | २५३ वा |
| ७ | कु. विहान सचिन झापकर | ३री | ७२ वा |
| ८ | कु. आनंद निरंजन वैशंपायन | ३री | ३५२ वा |
| ९ | कु. कार्तिकी जगदीश शिंदे | ४थी | २११ वा |
| १० | कु. अनिका आशुतोष गोळे | ४थी | ४१२ वा |
| ११ | कु. नचिकेत चैतन्य जोगळेकर | ४थी | ४४० वा |

श्री समर्थ सेवक मंडळाच्या स्त्री कल्याण संघटनेद्वारे दिनांक १७ व १८ ऑक्टोबरला वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन केले गेले होते. त्यात शाळेतील १ली ते ४थी च्या

मनावर काबू ठेवणे म्हणजे मनुष्याचा विकास आणि मनुष्यावर मनाचे वर्चस्व असणे म्हणजे विनाश होय.

विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्याचा निकाल खालीलप्रमाणे :-

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|
| कु. ऋचा अमेय ओक | १ली |
| कु. पार्थ अजिंक्य देशमुख | २री |
| कु. अर्जुन तेजस लेले | २री |
| कु. अन्वी ऋषिकेश केळकर | २री |
| कु. आरोही निनाद वालावलकर | ३री |
| कु. मिहिका वैभव काळे | ३री |
| कु. वनजा नर्सी राव | ३री |
| कु. तनिष्का सुनील कदम | ४थी |
| कु. विहान सचिन झापकर | ४थी |

**आंतरराष्ट्रीय Spell Bee परीक्षेचा निकाल**

स्तर पहिला–आंतरशालेय स्तर

आंतरशालेय प्रथम क्रमांक – **कु. सान्वी कार्तिक मूडबिद्री – इ. ३री – प्राप्त गुण – १००**

✻ शाळेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|
| कु. अन्वी अजय गोखले | १ली | ९६ |
| कु. शारव अमेय आपटे | ४थी | ९८ |

✻ उत्कृष्ट श्रेणीत यश मिळवणारे विद्यार्थी :-

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. वीरा संदीप कोळी | १ली | ८८ |
| २ | कु. सर्वेश समीर गोगटे | १ली | ८४ |
| ३ | कु. मेहेक मंदार शितुत | १ली | ८२ |
| ४ | कु. हर्ष रविकांत रसाळ | १ली | ८० |
| ५ | कु. किआरा भरत लेले | १ली | ७६ |
| ६ | कु. अवनीश तुषार चव्हाण | २री | ७६ |
| ७ | कु. स्वानंद स्वप्निल बेलोसे | ३री | ९८ |
| ८ | कु. नुपूर हितेश जोशी | ३री | ९६ |
| ९ | कु. अद्वैत आकाश वझे | ३री | ९४ |
| १० | कु. अथर्व समीर रानडे | ३री | ९४ |
| ११ | कु. अस्मी योगेश कानडे | ३री | ९२ |
| १२ | कु. ओजस अद्वैत मोडक | ३री | ९० |
| १३ | कु. विहान वर्धन ताम्हणकर | ३री | ८८ |
| १४ | कु. सान्वी विश्वजीत भगत | ३री | ८८ |
| १५ | कु. युक्ता धीरज झगडे | ३री | ८६ |
| १६ | कु. ओजस प्रकाश घाग | ३री | ८६ |
| १७ | कु. साची सचिन पवार | ३री | ८६ |
| १८ | कु. रेवा सचिन पिंपळे | ३री | ८४ |
| १९ | कु. शमिका सूरज केळकर | ३री | ८४ |
| २० | कु. स्वरांगी अमित चव्हाण | ३री | ७८ |
| २१ | कु. मधुरा मयूर जाधव | ३री | ७८ |
| २२ | कु. मृणाल सचिन देवधर | ३री | ७८ |
| २३ | कु. काव्या मिलिंद निलावे | ३री | ७६ |
| २४ | कु. श्लोक राहुल सरोदे | ४थी | ९० |
| २५ | कु. स्वर श्रीकांत फणसे | ४थी | ९० |
| २६ | कु. अर्णव नीतिन दांडेकर | ४थी | ८८ |
| २७ | कु. शौर्य समीर मोडक | ४थी | ८४ |
| २८ | कु. सारा योगेश सावंत | ४थी | ७६ |

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**प्राप्त पारितोषिके**

✻ सौ.ए.के. जोशीच्या श्री. केशव चौधरी यांना ''स्काऊट ट्रेनिंग कमिशनर'' पुरस्कार प्राप्त झाला असून, विजयचिन्ह आणि प्रमाणपत्र हे पुरस्काराचे स्वरूप.

✻ भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेच्या २९ व्या आंतरराष्ट्रीय NCSC स्पर्धेत सौ. ए. के.

जोशीच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

१) रुचिर दामले
२) जय जोशी
३) निलम शेजवलकर
४) स्वराज चव्हाण

* राज्यपुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांची नावे
  १) राजवीर चव्हाण
  २) रुद्र कारंजकर

* इंडोनेशीया IYSA (Indonesia Youth Science Association) येथे आयोजित करण्यात आलेल्या (WSEEC) Science, Environment and Engineering Competition स्पर्धेत सौ. ए.के. जोशीच्या निलभ शेजवलकर आणि स्वराज चव्हाण या विद्यार्थ्यांनी 'Mask Bricks' हा प्रयोग दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे सादर करून रौप्य पदक पटकावले.

* सौ. ए.के. जोशीच्या शिक्षिका सौ. नमिता जोशी यांना ब्राह्मण सेवा संघ ठाणे यांच्यातर्फे 'सर्वोत्कृष्ट शिक्षिका' पुरस्कार प्राप्त झाला.

* कुमारी तन्वी गद्रे या विद्यार्थीनीने इतिहास शिक्षक महासंघातर्फे (२०१९-२०) आयोजित महाराष्ट्र राज्य इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले. पदक, प्रशस्तीपत्रक व बक्षीस स्वरूप रक्कम देऊन तिचा गौरव करण्यात आला.

* दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी मराठी विज्ञान परिषदेद्वारे आयोजित पथनाट्य स्पर्धेत आपल्या शाळेने तृतीय पारितोषिक पटकावले. नाटकाचे लेखन शाळेच्या संगीत शिक्षिका सौ. वीणा जोशी यांनी केले होते.

* कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :
  १) आर्या लेले
  २) आदिनाथ पेंडसे
  ३) अस्मी वर्तक
  ४) आर्यन परांजपे
  ५) तनिष्का चौधरी
  ६) मधुरा वैद्य
  ७) आरुषी धारप
  ८) ओम मेटे
  ९) अर्णव रानडे
  १०) अद्वैत वाचकवडे
  ११) कार्तिक झाला
  १२) श्राध्वी बर्वे

* दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ रोजी 'आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालय कै. मुग्धा चिटणीस-घोडके कला सांस्कृतिक प्रतिष्ठान', ठाणेद्वारे आयोजित कथाकथन स्पर्धेत आपल्या शाळेची विद्यार्थीनी कुमारी यशश्री दाभोळकर हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून; सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व बक्षीसाची रोख रक्कम देऊन तिचा गौरव करण्यात आला. तसेच शाळेचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

* **Spell Bee International language for life level - I**

**सर्वाधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| ७ वी | राधिका रणदिवे | ९२ |
| ८ वी | आर्या राऊत | ९६ |

* इयत्ता ६ वीच्या कुमारी स्नेहा पाटील हिने Maths Aptitude test exam ही परीक्षा ९२ गुणांसह उत्तीर्ण केली आहे. ही परीक्षा Mathematics Education तर्फे आयोजित केली होती. या संस्थेकडून दोन पुस्तके देऊन तिचा गौरव करण्यात आला.

---

इतिहास सांगतो की, काल सुख होतं! विज्ञान सांगतं की, उद्या सुख असेल! पण माणुसकी सांगते की, जर मन खरं असेल आणि हृदय चांगलं असेल तर दररोज सुख आहे..!

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी – बेडेकर महाविद्यालयाचे मुंबई विद्यापीठ अंतर्गत विभागीय फेरीत बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश.

मुंबई विद्यापीठ अंतर्गत विभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे दिनांक २६ ऑगस्ट २०२२ रोजी, शंकर नारायण महाविद्यालय, भाईंदर येथे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील बुद्धिबळपटू चमुहाने सांघिक स्वरूपात प्रथक क्रमांक मिळवित, सुवर्णपदक आणि चषक पटकाविला.

त्याचसोबत वैयक्तिक गटात तृतीय वर्ष कला शाखेतील तत्त्वज्ञान विषयाचा विद्यार्थी ध्रुव मुठे याने तृतीय क्रमांक पटकावत कांस्य पदक मिळवित, पुढील टप्प्यातील स्पर्धेसाठी असणाऱ्या संघात निवड झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, त्याचसोबत उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. संगीता दीक्षित यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. विजयी चमूने संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांची भेट घेतली असता, त्यांनी सदर विद्यार्थ्याचे अभिनंदन करत पुढील उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी श्री. अशोक चिटणीस आणि संस्थेच्या इतर पदाधिकारी यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



जिमखाना समितीचे प्रमुख डॉ. प्रमोद खराटे, प्रा. रोहिणी डोंबे, कोच प्रा. यतिन पंडित आणि सर्व जिमखाना समितीच्या अथक मेहनत आणि प्रयत्नाने हे यश संपादन झाले.

### 'राष्ट्रीय खेळ दिन' उत्साहात संपन्न

महाविद्यालयाच्या जिमखाना समितीच्या वतीने राष्ट्रीय खेळ दिनाचे औचित्य साधून सोमवार दि. २९ ऑगस्ट २०२२ रोजी सदर दिवस जल्लोषात साजरा केला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाने या प्रसंगी महाविद्यालयीन पातळीवर बुद्धिबळ स्पर्धा, 'स्पोर्ट्‌स आणि फिटनेस' विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन, आणि तरुणाईला भुरळ पाडणाऱ्या 'चक दे! इंडिया' सिनेमाचे विद्यार्थ्यांसाठी प्रक्षेपण, अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेत एकूण ४४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, मुलांच्या गटात ४ आणि मुलींच्या गटात ४ असे अंतिम विजयी घोषित करण्यात आले.

खेळातील तज्ज्ञ म्हणून ॲथलेटिक कोच श्री. सुशील इनामदार यांनी 'स्पोर्ट्‌स आणि फिटनेस' या विषयावर विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे आणि ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व आणि आपले ध्येय गाठण्यासाठी आपण तंदुरुस्त राहणे महत्त्वाचे असून, त्यासाठी खेळ अतिशय महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी कबड्डीचे कोच श्री. हरेश्वर कोळी, खो–खो कोच श्री. कमलाकर कोळी, बुद्धिबळाचे

कोच प्रा. यतिन पंडित यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी कामिनी आणि मृण्मयी या विद्यार्थिनींनी केले.

तरुणाईला भुरळ पाडत, प्रेरणा देणाऱ्या 'चक दे! इंडिया' या प्रसिद्ध चित्रपटाचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

सदर कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. संगीता दीक्षित यांचे मार्गदर्शन लाभले.

जिमखाना समिती प्रमुख डॉ. प्रमोद खराटे, प्रा. रोहिणी डोंबे आणि संपूर्ण जिमखाना समिती सदस्य यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उत्तम नियोजन आणि मेहनत घेऊन सदर 'राष्ट्रीय खेळ दिन' निमित्त आयोजित कार्यक्रम यशस्वी पार पाडले.

**सामाजिक जाणिवा विस्तृत करणाऱ्या चित्रपटांची गरज – दिग्दर्शक राजदत्त**

डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेत चौतीसावे व्याख्यान संपन्न.

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम आज दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात पार पडला. आजच्या स्मृती व्याख्यानमालेचे हे चौतीसावे पुष्प होते. व्याख्यानमालेसाठी व्याख्यात्ये म्हणून ज्येष्ठ सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजदत्त यांनी 'मराठी चित्रपटांची सुवर्ण वाटचाल' या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला.

डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची समृद्ध परंपरा आणि त्यातून होणारे विचारमंथन याविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी वक्तव्य केले. राजदत्त यांचा पत्रकारिता क्षेत्रापासून ते चित्रपट दिग्दर्शक असा प्रवास या मुलाखतीत उलगडला. ७० ते ८० च्या दशकात प्रदर्शित झालेल्या चित्रपट आणि त्यांचे विषय याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. 'माध्यम हे प्रभावी माध्यम आहे त्याचा वापर सामाजिक जाणिवा जागृत करण्यासाठी व्हावा', असे वक्तव्य त्यांनी केले. बाळ कोल्हटकर, राजाभाऊ परांजपे, भालजी पेंढारकर, विनोबा भावे अशा अनेक व्यक्तींच्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. भविष्यात उत्तमोत्तम सामाजिक जाणिवा विस्तृत करणारे चित्रपट प्रदर्शित होतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.




कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी काही प्रश्न राजदत्त यांना विचारले. या कार्यक्रमास उपप्राचार्या संगीता दीक्षित, ग्रंथपाल नारायण बारसे, प्रा संतोष राणे व इतर प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. कोकण विभागाचे विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश शेट्ये हे देखील उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, तसेच उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, तसेच मुलाखत घेण्याचे काम प्राध्यापिका मानसी जंगम यांनी पार पाडले. व्याख्यानाची सांगता पसायदानाने झाली.

**संस्कृत दिन कार्यक्रम**

प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनानुसार संस्कृत विभागाने दि.२३/९/२२ रोजी संस्कृत दिन

साजरा करण्यात आला. साठ्ये महविद्यालयाच्या संस्कृत विभाग प्रमुख प्रा. स्वाती बेलसरे मुख्य अतिथी होत्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वादन, नाटक आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.



विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन ते आभार प्रदर्शन अशी कार्यक्रमाची संपूर्ण धुरा सांभाळली. प्रमुख पाहुण्यांनी, 'भविष्यातील संस्कृत विषयातील संधी' यावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. सर्व उपस्थितांनी कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद देत विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, 'हर घर तिरंगा' या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या संस्कृत सप्ताहातील स्पर्धेच्या विविध विजेता स्पर्धकांना मान्यवरांकडून प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास IQAC समन्वयिका डॉ. प्रज्ञा राजेबहादूर, प्रा. मोनिका देशपांडे, प्रा. नीता पाठक, प्रा. महाडिक, भूगोल विभाग प्रमुख प्रा. अर्चना डोईफोडे, डॉ. सुजा रॉय, डॉ. इंद्राणी रॉय, वाणिज्य प्रमुख डॉ. रश्मी अग्निहोत्री, बिव्होक समन्वयिका डॉ. अर्चना प्रभुदेसाई, डॉ. प्रशांत धर्माधिकारी, प्रा. शिवाजी नाईक, डॉ. जयश्री सिंग, प्रा. प्रतीक्षा कुळकर्णी, प्रा. चेतना ठोंबरे, बांदोडकर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. निशा वर्तक, प्रा. कोमल बापट, तसेच इतरही प्राध्यापक वृंदानी आपली उपस्थिती दर्शविली संस्कृत भारतीचे अनेक मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

सुरवाणी संस्कृतच्या प्राचार्या ऋतुजा वेलणकर, गीता धर्म मंडळाच्या शिक्षिका वंदना कुणकीकर, तसेच पालक वर्ग आणि इतर अनेक मान्यवर कार्यक्रमास आशीर्वाद व शुभेच्छा देण्यास उपस्थित होते.

प्रा. संस्कृत विभाग प्रमुख स्वाती भालेराव व श्रेया मोघे, तसेच संस्कृत विभागच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भरपूर परिश्रम घेतले.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय, ठाणे

पर्यावरण शास्त्र व जैवविविधता आणि वन्यजीव शास्त्र संवर्धन व्यवस्थापन विभागातर्फे ३ सप्टेंबर २०२२ रोजी 'Walk with the Butterflies' या विषयावर माजी विद्यार्थिनी क्लारा कोरिया यांनी मार्गदर्शन केले.

बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय आणि प्रदूषण नियंत्रण विभाग, ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ७ सप्टेंबर २०२२ रोजी International Clean Air Day निमित्ताने 'Clean Air for Blue Skies' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

जैवरसायनशास्त्र विभागातर्फे १४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत Food Adulteration and Quality Management हा दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम विभाग प्रमुख कु. सायली दफ्तरदार व सहाय्यक प्राध्यापक कु. पूजा कानसे यांनी यशस्वीरित्या पार पाडला.

एम.एस.सी इन क्लीनिकल सायकॉलॉजी या अभ्यासक्रमाचे उद्घाटन १५ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाले. यावेळी डॉ. कैलास पवार, डिस्ट्रिक्ट सिव्हिल सर्जन, ठाणे जिल्हा; श्री. रतन लोखंडे, डिस्ट्रिक्ट स्टोर इन्चार्ज, श्री. विनोद जोशी, सायकॉलॉजी डिपार्टमेंट हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

१९ सप्टेंबर २०२२ रोजी विविध विभागांचे ISO

Internal Audit घेण्यात आले, ज्यामध्ये श्री. महेश चिलकवाड यांनी प्राचार्य व आयसो समन्वयक, ॲडमिशन प्रवेश प्रक्रिया आणि ग्रंथालय विभाग यांचे परीक्षण केले.

जैव रसायनशास्त्र विभागातर्फे मुंबई विद्यापीठात आयोजित अविष्कार रिसर्च कन्वेंशन मध्ये सहभागी होण्याकरता मुलांमध्ये जागरूकता आणि संशोधन वृत्ती निर्माण होण्याच्या दृष्टीने कु. मिताली चिंदरकर सिन्नरकर, सहाय्यक प्राध्यापक, जैव रसायनशास्त्र विभाग यांनी १९ सप्टेंबर २०२२ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती.

२१ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोजेस कोलेट आणि आणि सर्व विनाअनुदानित विभागाचे शिक्षक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये 'Teaching Methodology for Effective Teaching' यावर चर्चा करण्यात आली.

समाज कल्याण विभागातर्फे विविध शिष्यवृत्ती बद्दल मार्गदर्शन करण्याकरता २१ सप्टेंबर २०२२ रोजी बांदोडकर महाविद्यालय कार्यालय विभाग आणि समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पतंजली सभागृहात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

महिला सबलीकरण कक्षातर्फे (Women Development Cell) २१ सप्टेंबर २०२२ रोजी 'Know Your Rights' या विषया ॲडवोकेट ज्योत्स्ना बनाले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

२२ सप्टेंबर २०२२ रोजी Shaping Career Opportunities through Innovations या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेचे आयोजन २३ सप्टेंबर २०२२ रोजी करण्यात आली. यावेळी Millets: The super food on your plate या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट आणि प्राध्यापकवर्ग डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. किरण परिया, डॉ. उर्मिला कुमावत, कु. सुमय्या शेख, कु. अजबा अन्सारी, कु. शर्मिन शेख या सात जणांनी Mastersoft यांनी २० सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित केलेल्या "Higher Education Conclave 2022" या प्रशिक्षण शाळेमध्ये आपला सहभाग नोंदवला.

"Food Adulteration and Quality management' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांकरता २५ सप्टेंबर २०२२ रोजी अक्षया चैतन्य येथे जैव रसायनशास्त्र विभागातर्फे भेट देण्यात आली होती. यावेळी ३० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दिवाळी सणानिमित्त मुलांना आकाश कंदील बनवण्याकरता प्रशिक्षण देण्याच्या उद्दिष्टाने १५ ऑक्टोबर २०२२ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

जागतिक मानसिक आरोग्य दिन या निमित्ताने १४ ऑक्टोबर २०२२ रोजी क्लीनिकल सायकॉलॉजी विभागाच्या जुई पिंपळे यांनी "Mental Health and Well being" या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान दिले. तसेच स्किट, शॉर्ट फिल्म या माध्यमातून 'मेंटल हेल्थ' या विषयावर अधिकाधिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

जैवतंत्रज्ञान विभागाचा माजी विद्यार्थी कु. सुभाष खत्री याने "How to Crack Entrance Examinations" या विषयावर १५ ऑक्टोबर २०२२ रोजी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

**अनुबंध**

'अनुबंध' माजी विद्यार्थी संघटनेतर्फे संघटनेचे

अध्यक्ष श्री. संजय आठवले यांनी १० सप्टेंबर २०२२ रोजी ''स्वसंरक्षण'' (Self Defence) या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती.

बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय व अनुबंध माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्वरांजली पुष्प चौथे'' या कार्यक्रमाचे आयोजन १७ सप्टेंबर २०२२ रोजी पाणिनी सभागृहात करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्पिता मुळे, विभाग प्रमुख, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व डॉ. जयश्री पवार, विभाग प्रमुख, जैवतंत्रज्ञान विभाग यांनी यशस्वीरित्या पार पाडले.

जैवतंत्रज्ञान विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अश्विनी टिळक व राधिका बर्वे, अनुबंध माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य सौ. शुभदा फाटक व श्री. नचिकेत कोल्हटकर आणि श्वेता कुलकर्णी, स्वरांगी सोमण, प्रगती चौधरी, अथर्व बगाडे, यश देसले, सानिका टेमकर, सलोनी टेमकर, ख्याती गुप्ता, इशा पिसाळ, इशिता मोपकर, वैदही आंबेरकर, श्रावणी कुलकर्णी, दिशा कोळी या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमामध्ये सादर केलेल्या चित्रकला, गायन आणि नृत्य या कलेच्या माध्यमातून सादरीकरण केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोहेल अन्सारीयांनी देखील एक गाणं सादर केले. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य उत्तम जोशी, डॉ. सुधाकर आगरकर हे उपस्थित होते. डॉ. अश्विनी टिळक यांनी सादर केलेल्या पसायदानाने या संगीत संध्येची सांगता झाली.



राष्ट्रीय सेवायोजना (NSS) विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

२४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सकाळी आठ वाजता प्रमुख पाहुणे श्री. क्लेमेंट पावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

२ ऑक्टोबर २०२२ रोजी पर्यावरण दक्षता मंच व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरंग महाविद्यालय येथे स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये फायरलेस कुकिंग, चित्रकला स्पर्धा व बेस्ट आउट ऑफ वेस्ट या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना दहा विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.




मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २ ऑक्टोबर २०२२ रोजी गेटवे ऑफ इंडिया मुंबई येथे 'भजन संध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बांदोडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सतरा स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आणि मेंटर कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर २०२२ रोजी Mentorship Orientation Program आयोजित करण्यात आला होता. यामध्ये प्राचार्य डॉ मोजेस कोलेट डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. किरण परिया आणि डॉ. अजित भूमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ११९ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवला.




मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे १८ ऑक्टोबर २०२२ रोजी ''फिट इंडिया कॅम्पेन'' आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये १०० मीटर धावणे, योगा, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा या सर्व प्रकारांमधून फिटनेस कसा राखला जाईल याबद्दल मार्गदर्शन केले. या कॅम्पेन मध्ये २९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.



राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने २३ ऑक्टोबर २०२२ रोजी 'प्रदूषण मुक्त दिवाळी' हा कार्यक्रम बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात संपन्न झाला. यावेळी सुरेंद्र दिघे, विश्वस्त जिज्ञासा ट्रस्ट, डॉ. महेश बेडेकर, विद्या प्रसारक मंडळ यांनी मार्गदर्शन केले. दिवाळीमध्ये फटाक्यांच्या वापराने होणाऱ्या प्रदूषणाचे परिणामांना बहुतांशी सामोरे जावं लागतं याकरता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला १३८ विद्यार्थी आणि १३ शिक्षक उपस्थित होते.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या अकरा स्वयंसेवकांनी मेहता महाविद्यालयातर्फे आयोजित गुंज फेस्टिव्हलमध्ये ग्रुप नृत्य प्रकारात द्वितीय पारितोषिक पटकावले.

**पालक सभा**

विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्याच्या प्रगतीबद्दल माहिती करून देण्याच्या दृष्टीने, तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रमांबद्दल माहिती पालक सभेमधून देण्यात येते. तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या संख्या शास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांची पालक सभा ७ सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेला १७ पालक उपस्थित होते.




**विद्यार्थ्यांचे यश**

३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२२ रोजी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या कॅम्प मध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचे दोन छात्र कु गायत्री गायकर आणि कु श्रीकांत गिलबिले यांची निवड झाली होती व त्यांनी हा कॅम्प यशस्वीरीत्या पूर्ण केला.

'कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेत' कनिष्ठ महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत अकरावीची विद्यार्थिनी रागिणी भोसले हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

तृतीय वर्ष विज्ञान शाखेची जैवतंत्रज्ञान विभागाची विद्यार्थिनी कुमारी कविता गुरुकेला हिच्या **'बायोडिग्रडेशन**

**ऑफ प्लास्टिक'** या प्रकल्पाकरिता शिष्यवृत्ती मंजूर झाली. रोख रक्कम रुपये दहा हजार अशी एकूण तीन महिन्यांकरता ही शिष्यवृत्ती या विद्यार्थिनीला देण्यात येणार आहे.

प्रथम वर्ष विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कुमारी संपदा कुलकर्णी आणि द्वितीय वर्ष विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कुमारी आकांक्षा सिंग यांनी लोकमत न्यूज चैनल तर्फे आयोजित ६४ कला या कार्यक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला.

'सेवा विवेक केंद्र' या सामाजिक संस्थेतर्फे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला बांबू राखी ट्रायबल इन्फॉर्मेशन इनिशिएटिव्ह घेतल्याबद्दल प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

**शिक्षकेतर सहकाऱ्यांचे यश**

सौ देवयानी लढे, जिमखाना विभाग यांची अंतर विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत सदस्य म्हणून सदस्य व्यवस्थापक म्हणून मुंबई विद्यापीठातर्फे निवड करण्यात आली.

**ग्रंथालय विभाग**

विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी आणि सामाजिक भान राखले जावे, देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचे स्मरण व्हावे या दृष्टीने ग्रंथालय विभागातर्फे विविध दिन साजरे करण्यात येतात.

ग्रंथालय विभागातर्फे ७ सप्टेंबर २०२२ रोजी राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

ग्रंथालय विभागातर्फे १७ सप्टेंबर २०२२ रोजी केशव सीताराम ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.



ग्रंथालय विभागातर्फे २७ सप्टेंबर २०२२ रोजी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची ५० वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या विषयी माहितीचे व पुस्तकांचे प्रदर्शन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या बद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

ग्रंथालय विभागातर्फे नवरात्रीचे औचित्य साधून स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन २६ सप्टेंबर २०२२ ते ४ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत भरविण्यात आले होते. यामध्ये २६ सप्टेंबर रोजी मराठी साहित्य विषयावरील पुस्तके प्रदर्शित करण्यात आली होती. २७ सप्टेंबर रोजी इंग्रजी साहित्य विषयावरील पुस्तके, २८ सप्टेंबर रोजी गणित व संख्याशास्त्र विषय, २९ सप्टेंबर रोजी माहिती तंत्रज्ञान व भौतिकशास्त्र, ३० सप्टेंबर रोजी पर्यावरण शास्त्र, १ ऑक्टोबर रोजी मानसशास्त्र, ३ ऑक्टोबर रोजी जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र आणि ४ ऑक्टोबर रोजी रसायन शास्त्र अशा विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन संपन्न झाले.




संयम हा खूप कडवट असतो, पण त्याचे फळ फार गोड असते.

३ ऑक्टोबर २०२२ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५३ वी जयंती, तसेच द्वितीय पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची ११८वी जयंती साजरी करण्यात आली. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या वरील माहितीचे व पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.



०९ ऑक्टोबर २०२२ रोजी महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करण्यात आली. तसेच यांच्या वरील माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.



माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून शासनाने घोषित केली आहे. या निमित्ताने १५ ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ.ए.पी.जे.अब्दुल यांच्या ९१ व्या जयंती निमित्त त्यांच्यावरील माहितीचे व पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. विद्यार्थ्यांकरिता डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यावरील आधारित ऑनलाइन प्रश्नमंजुषेचे आयोजन देखील ग्रंथालय विभागातर्फे करण्यात आले होते.



ग्रंथालय विभागातर्फे ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस, तसेच सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. तसेच त्यांच्यावरील माहितीचे व पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच त्यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती दिली.




## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

३ ऑक्टोबर, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता कॉलेज डेव्हलपमेन्ट कमिटी आणि इंटरनल क्वालिटी ॲशुरन्स कमिटी (IQ-C) ची बैठक आयोजित करण्यात आली होती. १) कायदा, तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान आणि २) रिअल इस्टेट कायद्यांवरील सर्टिफिकेट प्रोग्राम कॉलेज डेव्हलपमेन्ट कमिटीने मंजूर केले आहेत.

१३ सप्टेंबर २०२२ रोजी ॲडमिशन कमिटीची बैठक सामान्य प्रवेश परीक्षा कक्षानुसार नियोजित असलेल्या प्रथम वर्ष विधीच्या प्रवेशाबाबत तपशीलवार काम करण्यासाठी घेण्यात आली होती.

आमच्या महाविद्यालयाच्या 'प्राणी संरक्षण कायद्यांवरील ॲड ऑन सर्टिफिकेट प्रोग्राम' च्या तिसऱ्या बॅचचे वर्ग १६ सप्टेंबर, २०२२ रोजी सुरू झाले. यावेळेस २२ विद्यार्थ्यांच्या नोंदणीसह वर्ग सुरू झाले.



राग हा शब्द फार लहान आहे; पण आयुष्य बरबाद करण्यासाठी पुरेसा आहे!

दिनांक १० आणि २८ सप्टेंबर २०२२ रोजी तिसऱ्या वर्ष विधीच्या सत्र - पाचची अंतर्गत वर्ग परीक्षा आणि सबमिशन घेण्यात आले.

दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाची सुवर्णमहोत्सवी विशेष डिजिटल स्मरणिका पूर्ण झाली आणि विद्या प्रसारक मंडळाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली.




प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचा भारतातील प्रतिष्ठित इंडियन लॉ इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली च्या आजीवन सदस्यत्वासाठीचा अर्ज संस्थेने स्वीकारला आहे आणि त्यांना आजीवन सदस्यत्व मंजूर केले आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

दि. ८/९/२०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या (कॉलेज कॅम्पस) मध्ये स्वच्छता मोहिमेची सुरुवात सकाळी ८.३० वाजता झाली. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने या मोहिमेची सुरुवात केली. या मोहिमेची सुरुवात डॉ. महेश बेडेकर यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. आपल्या कॉलेजच्या परिसराची स्वच्छता ही आपल्या सर्वांच्या हातात आहे. कॉलेज कॅम्पस अतिशय सुंदर आहे. त्याला सांभाळणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. इतर विद्यार्थ्यांमध्ये जागृतता आणणे तेवढेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी आपल्या संभाषणात सांगितले. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांच्या मार्गदर्शनाने विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील (I.S.T.E. Chapter (2022-23) (Students Chapter) च्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मोहिमेत तंत्रनिकेतनातील शिक्षक व शिक्षकेत्तर वर्गाने सहभाग घेतला. सदर मोहिमेमध्ये ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे (डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था) म्हणजेच डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. संस्थेला जाहीर करताना अभिमान वाटतो की, ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांना २७ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण नवोन्मेष आणि तंत्रज्ञान शिखर परिषदेच्या द्वितीय आवृत्ती 'वर्ष २०२२ मधील भारतीय उच्च शिक्षण पुरस्कारा' अंतर्गत 'डायरेक्टर ऑफ द इयर २०२२' या श्रेणीतील, भारतीय उच्च शिक्षण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या श्रेणी अंतर्गत भारतभरातून आलेल्या आवेदनांमधून निवडलेल्या ५० अव्वल शिक्षक उमेदवारांमधून (प्रोफाइलमधून) डॉ. नीतिन जोशी यांची निवड करण्यात आली. हॉटेल प्राइड प्लाझा, एरोसिटी, नवी दिल्ली येथे ब्रेनवंडर्सच्या सहकार्याने युनिव्हर्सल मेंटर्स असोसिएशनने हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात १०० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये, व्यवस्थापन अभ्यास संस्था (बी-स्कूल), आयआयटी, एनआयटी, आयआयआयटी, आयआयएम आणि खाजगी विद्यापीठांचे, कुलपती, कुलगुरू, डीन, कुलसचिव, संचालक उपस्थित होते व त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या भूमिकेबद्दल चर्चा केली. या एकदिवसीय कार्यक्रमात उद्योग क्षेत्रातील नेत्यांची भूमिका अधोरेखित

करण्यात आली आणि शिक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञानावर जोरदार चर्चा झाली.




२ सप्टेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या योग प्रमाणन मंडळाद्वारे ''योग वेलनेस इन्स्ट्रक्टर'' द्वितीय स्तर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.




३ सप्टेंबर: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सोशल रिफॉर्म अँड रिसर्च (IISRR), कोलकाता तर्फे आयोजित, ''यु जी सी ड्राफ्ट गाईडलाईन्स फॉर एन्गेजिंग प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उदघाटनासाठी सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. नीतिन जोशी यांना आमंत्रित करण्यात आले. या परिसंवादात ''प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसेस'' या यु जी सी तर्फे जाहीर झालेल्या पदासाठी मार्गदर्शक तत्त्वासंदर्भात संबंधित तज्ज्ञ मंडळींतर्फे सादर करण्यात आलेली मते, तसेच अभिप्राय आणि सूचना विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) कडे पाठविण्यात येणार आहेत.

३ सप्टेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी एम एम एस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी एक सत्र आयोजित केले आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी ॲमेझॉनच्या ब्रँड मॅनेजर व ब्रिम्सची माजी विद्यार्थिनी सुश्री प्रियांका पुजारी यांना आमंत्रित केले.




श्री. संजय सपकाळ यांनी सप्टेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यात CRISIL संशोधन डेटाबेस सदस्यत्व खरेदी आणि ते सक्रिय करण्यासाठी समन्वयन केले.

डॉ. व्ही. एन. ब्रिम्स ग्रंथालयासाठी डेटाबेसमधील खालील उद्योगांचे सदस्यत्व घेतले आहे.

१) विमान सेवा २) बँकिंग ३) कार आणि उपयुक्तता वाहने ४) कोल्ड चेन ५) व्यावसायिक वाहने ६) अन्न ७) कंटेनर फ्रेट स्टेशन्स/इनलँड कंटेनर डेपो ८) पॅकेजिंग ९) द्रुत सेवा रेस्टॉरंट्स १०) परिष्करण आणि विपणन ११) किरकोळ वित्त – गृहनिर्माण १२) किरकोळ विक्री १३) ई-कॉमर्स १४) शैक्षणिक सेवा १५) रुग्णालये १६) घरगुती उपकरणे १७) IT सक्षम सेवा १८) सौर ऊर्जा १९) स्टील उत्पादने २०) दूरसंचार सेवा.

१९ – २४ सप्टेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना गोदरेज एरोस्पेस तर्फे व्यवसाय उत्कृष्टता मूल्यांकनासाठी आमंत्रित करण्यात आले.

आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य मोठे असते.




१५ सप्टेंबर : ब्रिम्स आणि इ आर सी (ERC) संस्था, सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी यासाठी सुरुवातीपासून यशस्वी समन्वयन केले.


ERC INSTITUTE

be different · be ERCI

१६ सप्टेंबर : उच्च प्रमाणीकरणाच्या दिशेने संस्थात्मक पुढाकाराचा एक भाग म्हणून AIMA आणि AACSB (द असोसिएशन टू ॲडव्हान्स कॉलेजिएट स्कूल्स ऑफ बिझनेस - यूएस) द्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय मानांकनासंबंधित अभिमुखतेसाठीच्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय वेबिनारला डॉ. पल्लवी चंदवासकर उपस्थित राहिल्या.




२० सप्टेंबर : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी एमराल्ड प्रकाशनाच्या द केस जर्नल, या स्कोपस अनुक्रमित नियतकालिकासाठी केस स्टडीचे समीक्षण केले.



Thank you for submitting your review of Manuscript ID TCJ-07-2022-0124 for The Case Journal — Yahoo/Inbox

The Case Journal <onbehalfof@manuscriptcentral.com> — Tue, 20 Sept at 4:40 pm
To: dipti_shakrani@yahoo.com
Cc: tcjeditor@gmail.com

Dear Mrs. DIPTI PERIWAL:

Thank you for submitting your review of TCJ-07-2022-0124 for The Case Journal. We are very grateful for the contribution you have made to the journal by providing your review. We recognise the value that is added by our reviewers and would therefore like to thank you for your work, by granting you free personal access to up to 40 Emerald journal articles (excluding Backfiles) within a three-month period.


Early next month, we will send an email that will contain all the information you need to activate your personal free access.

Once you have received this email, all you will need to do is:
- click the link in the e-mail: this will take you directly to the Emerald log-in page
- If you have an Emerald MyProfile log in, simply log on using these details (this is different to the log in you use for ScholarOne)

२० सप्टेंबर : प्रा. डॉ. मुग्धा ए. भडकमकर यांनी एचडीएफसी लाइफ कंपनीच्या कॅम्पस प्लेसमेंट कार्यक्रमाचे समन्वयन केले. यामध्ये मध्ये कंपनी तर्फे प्री-प्लेसमेंट टॉक त्यानंतर ऑनलाइन चाचणी आणि मुलाखती आयोजित करण्यात आल्या. एम एम एस २०२१-२३ तुकडीमधून ७ विद्यार्थी ४.८० लाखाच्या वार्षिक पगारासाठी निवडले गेले.




२३ सप्टेंबर : डॉ. पंकज नांदूरकर आणि श्री. चैतन्य पवार यांनी एम एम एस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी ''ब्रिम्स मधील उद्योजकीय पर्यावरण आणि सहकार्य'' या विषयावर एक सत्र आयोजित केले.




२७ सप्टेंबर : ब्रिम्सच्या एन बी ए मुख्य समितीतर्फे मुख्य समन्वयक डॉ. पल्लवी चंदवासकर आणि सदस्य डॉ. स्मिता जपे, डॉ. पंकज नांदूरकर, प्रा. विभूती सावे आणि प्रा. महेश भानुशाली यांच्यासह डॉ. नीतिन जोशी यांच्या अध्यक्षतेखालील संस्थात्मक स्व-मूल्यांकन अहवाल (SAR) सादर केला. संस्थेच्या एन बी ए मान्यते साठी नोव्हेंबर महिन्यात परीक्षक समितीची भेट अपेक्षित आहे.

२७ सप्टेंबर : तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (DTE) द्वारे आयोजित केलेल्या हरित आवार (ग्रीन कॅम्पस) - अमृत महोत्सवामध्ये डॉ. व्ही. एन. ब्रिम्स ची मुंबईतील सर्वोत्तम ८ महाविद्यालयांमध्ये निवड झाली. ग्रीन कॅम्पस - अमृत महोत्सवाच्या मूल्यमापन समितीने १३ निकषांच्या मूल्यांकनाच्या आधारे सर्वोत्तम अशा ८ महाविद्यालयांची निवड केली आहे.

३० सप्टेंबर : मुंबई विद्यापीठातर्फे, डॉ. नीतिन जोशी यांची पी.एच.डी. साठीच्या ऑनलाईन मुलाखत परीक्षा आयोजन मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

डॉ. नीतिन जोशी यांना आयआयएमएम (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मटेरियल मॅनेजमेंट) तर्फे प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

डॉ. नीतिन जोशी यांनी लिहिलेले 'विक्री व्यवस्थापन' या विषयावरील 'सेलिंग मेड इंटरेस्टिंग' नावाचे वर्कबुक रायर्ट चॉईस या प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाले.


SELLING MADE INTERESTING

The workbook has been designed to engage and involve participants at intellectual level. The design of the workbook aims at higher order learning as defined clearly in Bloom's Taxonomy with special focus on Understanding, Analysing, Applying, Evaluating and Creating. The facilitation of the workshop using the workbook will provide opportunities for the participants to express themselves both in verbal and non-verbal communication with a clear objective of enhancing the power of expression of the participants. The use of the workbook will help in imbibing the concept of learning-by-doing and experiencing the challenges by creating a simulated environment in the classroom. The workbook helps to cover both theoretical and practical elements of sales thereby helping the facilitators and participants of the programs to develop right knowledge, right skills and right attitude which is most important for being sales professionals. This method of learning makes selling more interesting and engaging.

Dr. Nitin Joshi is a professional trainer and a marketing consultant with special focus on sales. He is currently working as a Director with Dr. V. N Bedekar Institute of Management Studies (DR VN BRIMS), Thane. He has over twenty-five years of rich and varied experience in Sales and Marketing with Industry leaders like Multi Commodity Exchange of India Ltd. (MCX) Datapro Information Technology Ltd. (DITL) and ATCO products Ltd. at various positions. His core areas of interest are Sales trainings, and grooming management students in the operations and marketing specialization. He is Master in engineering with honors and has completed Ph.D. in understanding green consumer behaviour. He also works as an Assessor for Business Excellence for EFQM Model.

Writers Choice Publications Pvt. Ltd.

₹395.00

३ ऑक्टोबर : प्रा. महेश भानुशाली यांनी भारतातील आघाडीची दूरसंचार कंपनी ''भारती एअरटेल'' मध्ये २०२२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या एम एम एस विपणन (मार्केटिंग) शाखेच्या ३ विद्यार्थ्यांना वार्षिक ४.५ लाख पगार + प्रोत्साहन भत्त्यासह रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या.

१. निलेश चौहान २. अनिकेत थोरात ३. वैष्णवी पुंडे.

''कॉर्पोरेट / बी२बी मार्केटिंग'' याप्रकारचे विद्यार्थ्यांचे कामाचे स्वरूप असेल.

३ ऑक्टोबर : ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी 'टर्नीटीन - वाङ्मयचौर्य शोध प्रणाली' (Turnitin Plagiarism Software) सदस्यत्व खरेदी करून ते सक्रिय करण्यासाठी समन्वयन केले.

Brims Library


turnitin

८ ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी यांना पॅसिफिक विद्यापीठासाठी उदयपूर येथे पीएचडी ची मुलाखत परीक्षा आयोजित करण्यासाठी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१३ ऑक्टोबर : डॉ. कांचन आणि प्रा. सिद्धेश यांनी एमएमएस विद्यार्थ्यांसाठी कल-चाचणी (विषय शाखा निवडी साठी) प्रिझम असेसमेंट चे माहिती सत्र आयोजित केले आणि नंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रिझम असेसमेंट (कल-चाचणी) आयोजित केली.

१५ ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी यांना पीएचडी उमेदवारांच्या प्रवेश-मुलाखतीसाठी सेंट फ्रान्सिस महाविद्यालय तर्फे संशोधन सल्लागार समिती सदस्य म्हणून आमंत्रित केले.

१५ ऑक्टोबर : विद्यार्थी विकास समितीतर्फे विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



१७ ऑक्टोबर : प्रा. सिद्धेश सोमण आणि स्वेता नायर यांनी एमएम एस २०२१-२३ तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार संधी मार्गदर्शन सत्र आयोजित केले. विपणन (मार्केटिंग), वित्त (फायनान्स), मानव संसाधन (एचआर) आणि प्रचालन (ऑपरेशन्स) या क्षेत्रांतील वैशिष्ट्यां नुसार नोकरीच्या भूमिका सादर करण्यावर हे सत्र केंद्रित होते. सत्राचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना 'वैयक्तिक मुलाखतींना प्रभावीपणे कसे सामोरे जावे' याचे प्रशिक्षणही देण्यात आले.




१८ ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी यांनी विद्यार्थ्यांसाठी ठाणे मॅनेजमेंट फोरमचे एस.एन. मूर्ती आणि श्री. राम वैद्य यांचे पाथ अहेड - जर्नी तो हॅप्पी करिअर (आनंदी कारकिर्दीचा प्रवास) या विषयावर एका सत्राचे आयोजन केले. ब्रिम्स आय क्यू ए सी समितीच्या विद्यार्थी सदस्यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

१९ ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी यांना केसी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट ठाणे (पूर्व) येथे मुलाखतींसाठी तज्ज्ञ समिती सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१९ ऑक्टोबर : डॉ. कांचन यांनी ब्रिम्स च्या प्रशासकीय आणि उप-प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी डॉ. अभय दौडखाने यांचे 'सॉफ्ट स्किल आणि शिष्टाचार' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला.





१९ ऑक्टोबर : डॉ. कांचन यांनी, प्रिझम संस्थेतर्फे श्री. रायन बरेटो यांचे प्रिझम (कल-चाचणी) अहवालाचे संक्षिप्त विश्लेषण (डीब्रीफिंग) सत्र आयोजित केले.

१९ ऑक्टोबर : प्रा. महेश मनोहर भानुशाली यांना मुंबई विद्यापीठाची पीएचडी.





डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन संस्थेमध्ये कार्यरत असलेले आणि शहापूर (ठाणे) येथे स्थायिक असलेले प्रा. महेश मनोहर भानुशाली, यांना मुंबई विद्यापीठाची व्यवस्थापन विषयातील विद्या वाचस्पती 'पीएचडी' ही पदवी जाहीर झाली आहे.

'भारतीय सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामधील आधुनिक तंत्रज्ञान विकास, व्यवस्थापन आणि हस्तांतरण प्रणाली' ह्या विषयात केलेल्या अतुलनीय संशोधन प्रबंधासाठी ही पदवी त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. येणाऱ्या काळात 'भारताला विकसीत राष्ट्राकडे घेऊन जाणाऱ्या वाटचालीत प्रा. भानुशाली यांनी केलेल्या संशोधनाचे महत्त्वाचे योगदान ठरणार आहे, सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्षमता आणि परिणामकारिता सुदृढ करण्याचे काम ही प्रणाली करेल' असे मत ओएनजीसी चे प्रमुख मानव संसाधन 'एम. गणेशन' यांनी व्यक्त केले आहे.

*ब्रिम्स तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !!*

२० ऑक्टोबर : प्रा. जान्हवी पोतदार आणि प्रा. दिनेश सोनकुल यांनी विद्यार्थ्यांसाठी पाताळगंगा एमआयडीसी येथील कोकुयो कॅमलिन लिमिटेड येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. वस्तुनिर्माण उद्योग संस्थांच्या कामाचा आढावा घेण्याच्या हेतूने २० ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज

तर्फे विद्यार्थ्यांसाठी एक शैक्षणिक सहल कोकयुयो कॅम्लिन लिमिटेड या औद्योगिक संस्थेमध्ये आयोजित करण्यात आली होती. मॅनुफॅक्चरिंग सेक्टरचे प्रेसिडेंट श्री. किशोर वठे, एच. आर विभागाचे जनरल मॅनेजर श्री. हेमंत तेजे यांच्यासह झालेल्या प्रत्यक्ष संवादात विद्यार्थ्यांनी औद्योगिक क्षेत्राशी निगडित काही प्रश्नांवरती चर्चा केली. अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या विविध विभागांमध्ये भेट देऊन औद्योगिक प्रक्रियेची पाहणी करण्याची संधी मिळाली.




२० ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी ए आय एम एस मुंबई विभागाच्या ऑनलाइन बैठकीला उपस्थित राहिले.

२१ ऑक्टोबर : व्यवस्थापन विद्यार्थ्यांचा सामाजिक उद्योजकतेच्या दिशेने पुढाकार या विषयावर आधारित पूर्वार्ध कार्यशाळेचे आयोजन.

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनजेमेंट स्टडीज, ठाणे म्हणजेच डॉ. व्ही.एन. ब्रिम्स (BRIMS) तर्फे शुक्रवार, २१ ऑक्टोबर २०२२ रोजी 'व्यवस्थापन विद्यार्थ्यांचा सामाजिक उद्योजकतेच्या दिशेने पुढाकार' (Management Students leading towards Social Entrepreneurship) या विषयावर आधारित पूर्वार्ध कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सामाजिक उद्योजकतेच्या पुढाकाराला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने डॉ. व्ही. एन. ब्रिम्स (BRIMS) तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये 'सृजना' या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, सुश्री ज्योतिका भाटिया - यांना प्रमुख वक्त्या म्हणून आणि 'हॅशटॅग व्हेंचर्स' या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नयन भेडा यांना या कार्यक्रमासाठी सन्माननीय पाहुणे आणि वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थापन पदवीधारकांमध्ये सामाजिक उद्योजकतेच्या पुरस्काराला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वत:ला नोकरी मिळवण्यापुरते मर्यादित न ठेवता त्या पलीकडे विचार करून त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घ्यावा, या संधी रोजगार नियुक्त होण्यासाठी तयार करतात आणि त्यांच्या कामाचा/उद्योगाचा समाजाला देखील फायदा होतो.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन समारंभाने झाली. ब्रिम्सचे संचालक महोदय, डॉ. नीतिन जोशी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात कार्यशाळेच्या विषयाचे महत्त्व विशद करून मान्यवर आणि उपस्थितांचे स्वागत केले. ब्रिम्सचे महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी सामाजिक उद्योजकतेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवणाऱ्या भारतीय सामाजिक उद्योजकांच्या समृद्ध इतिहासाविषयी सांगितले.

पहिल्या वक्त्या सुश्री. ज्योतिका भाटिया यांनी त्यांच्या बीजभाषणात त्यांच्या सृजना संस्थेची निर्मिती आणि आज त्याचा प्रभाव कसा निर्माण झाला याबद्दलचा त्यांचा प्रवास सांगितला.

त्यानंतरचे सन्माननीय पाहुणे श्री. नयन भेडा यांनी तीन मुख्य विषयांवर भाष्य केले.

अ) उद्योजकता ब) उद्योजक अयशस्वी का होतात क) सामाजिक उद्योजक

त्यांनी अनेकदा विविध उदाहरणे नमूद केली, ज्यामुळे प्रेक्षकांना विषय समजणे सोपे झाले आणि विद्यार्थी भारतात सामाजिक उद्योजकतेची गरज समजून घेऊ शकले.

कार्यशाळेच्या संयोजक डॉ. स्मिता जपे यांनी या विषयावर आपले विचार मांडले आणि सामाजिक उद्योजकता क्षेत्रात सहकार्यात्मक संशोधनाच्या गरजेवरही भर दिला.

डॉ. कांचन अक्षय यांनी समारोपाचे भाषण केले आणि त्यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.









दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी पूर्वार्ध कार्यशाळेचा एक भाग म्हणून 'परिवर्तन - २०२२' स्पर्धा आयोजित करण्यात आली; 'सामाजिक उद्योजकता' या विषय सूत्रावर आधारित एका सामाजिक उद्योग - व्यवसायाची योजना सादरीकरणाच्या या स्पर्धेमध्ये निवड झालेले ४ संघ आणि एकूण १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सादरीकरणात खूप मेहनत घेतली आणि पूर्वार्ध कार्यशाळेच्या विषयाला अनुसरून नावीन्यपूर्ण कल्पना मांडल्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून करिअर राईझर इन आणि टेक्नोमाईंड्स इन च्या संस्थापक सुश्री. दीपा राऊत आणि ब्रिम्सच्या माजी विद्यार्थिनी व कैरोस करिअर्स च्या सुश्री. रुचा पाल यांना आमंत्रित करण्यात आले होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर (MACCIA) च्या सदस्या देखील या सत्रात उपस्थित होत्या आणि त्यांनी देखील स्पर्धेच्या विषयासंदर्भात आपले विचार मांडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची दोन्ही परीक्षकांनी प्रशंसा केली, तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांचा मौल्यवान अभिप्राय दिला.

दोन संघांना विजेते घोषित करण्यात आले.

**प्रथम स्थान संघ** - तनया सावंत, तन्मय जोशी, हृषिकेश खरे, अवनी कुरूप

**उपविजेता संघ** - अभिषेक पाटील, अर्पण भोईर, अनिकेत धमाले.

एकंदरीत परिवर्तन स्पर्धेला शानदार यश मिळाले!!!

स्पर्धा कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. कांचन अक्षय आणि डॉ. मुग्धा भडकमकर यांनी केले.




२९ ऑक्टोबर : शैक्षणिक सल्लागार मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली. डॉ. पंकज नांदुरकर यांनी या बैठकीचे समन्वयन केले. यावेळी मंडळाचे सदस्य श्री. एस.एन.मूर्ती, श्री. गिरीश दंडिगे, डॉ. नयन भेडा, श्री. अजय रावल, डॉ. स्मिता जपे, संचालक डॉ. नीतिन जोशी, आणि ब्रिम्सचे प्राध्यापक उपस्थित होते.



३० ऑक्टोबर : डॉ. स्मिता जपे यांना बोरिवलीच्या, सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, आर्थिक व्यवस्थापन मध्ये मास्टर्स इन फिनान्शिअल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखत परीक्षेसाठी (VIVAAVOCE) तज्ज्ञ समिती सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक१५ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग व Institutional Innovation Council यांच्या संयुक्तविद्यमाने महाविद्यालयात स्थापत्य अभियंता दिन साजरा करण्यात आला. अभियंत्यांचे प्रेरणास्थान असलेल्या भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जयंतीदिन 'अभियंता दिन' यावेळी साजरा करण्यात आला.

दिनांक १६ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातर्फे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत एकूण १७ पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. ही सभा इन्स्ट्रुमेंटेशन विभाग प्रमुख प्रा. केतन कुंडिया आणि सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सदस्यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी प्रा. केशव चौगुले यांनी प्लेसमेंटच्या प्रयत्नांची उपस्थितांना माहिती दिली. प्रा. कुणाल किशोर यांनी आगामी GATE परीक्षेबाबत उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. परशुराम मोरे यांनी इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागामधील करिअरच्या संधींबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच यावेळी बैठकीच्या अजेंड्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.



दिनांक १६ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने दुपारी १२:३० ते १:३० या वेळेत पालक शिक्षक सभा आयोजित केली होती. या सभेसाठी सर्व प्राध्यापकांसह पालक ऑनलाईन मोड (Google Meet) द्वारे, तसेच ऑफलाईन मोड (प्रत्यक्ष पद्धतीने) उपस्थित होते. सदर पालक सभेला एकूण २२ पालक उपस्थित होते. सर्व उपस्थित पालकांचे स्वागत प्रा. प्रीती साठे यांनी केले. या सभेत कोविड नंतर विभागाच्या सर्व उपक्रमांचा विभागीय प्रेझेंटेशनचा समावेश होता. यावेळी महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांचे सर्व पालक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात आले.

दिनांक २१ सप्टेंबर २०२२ पासून State Common Entrance Test Cell Maharashtra यांच्या नोटीस प्रमाणे प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली. तसेच या महाविद्यालयाला सुविधा केंद्राची (Facilitation Centre) ची मान्यता मिळाली आहे. याठिकाणी प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे फॉर्म भरणे व कागदपत्रे तपासणे इत्यादी बाबी या सुविधा केंद्राद्वारे कार्यान्वित झाले आहे.




सुखासाठी कोणाकडे हात जोडू नका, वेळ वाया जाईल!

दिनांक २१ ते २५ सप्टेंबर २०२२ या कालावधीत महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर व शहा- अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, चेंबूर - मुंबई यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन आणि इलेक्ट्रॉनिक्स टेलीकम्युनिकेशन विभागातर्फे विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी "Innovations using IOT" या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी शहा - अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, चेंबूर मुंबईचे प्रा. संतोष कांबळे (सहाय्यक प्राध्यापक, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभाग) हे या कार्यशाळेसाठी तज्ज्ञ म्हणून लाभले. त्यांनी IOT इंटरफेसिंग बोर्ड, Arduino, Tinker Cad, Node MCU, MIT app inventor, RPi हेडलेस OS इंस्टॉलेशन, कमांड्स, प्रोग्राम इत्यादींविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ह्या कार्यशाळेत जवळपास २५ विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. अविनाश पवार व संस्थेच्या संचालिक डॉ. सौ. कीर्ती आगाशे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.




दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे प्रा. गणेश दिवे व श्री. संभाजी लोहार यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा घेतली. सदर कार्यशाळा ज्ञानदीप महाविद्यालय, मोरवंडे- बोरज याठिकाणी घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या येणाऱ्या संकटांचा सामना कसा करावा, विविध प्रकाराच्या प्रायोगिक उदाहरणातून स्वतःमध्ये बदल कसे करायचे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.




दिनांक २४ सप्टेंबर २०२२ महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाच्या १२ विद्यार्थ्यांनी आशिदा इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. या कंपनीला शैक्षणिक भेट दिली. आशिदा इलेक्ट्रॉनिक्स ही एक प्रसिद्ध खाजगी कंपनी असून जी विविध इलेक्ट्रॉनिक्स सर्किट, PLC आणि SCADA आधारित संरक्षण उपकरणे, अल्टरनेटरसाठी संरक्षण पॅनेल, 131 KV बस बार यांचे उत्पादन करते. या औद्योगिक भेटीत कंपनीच्या एच.आर मॅनेजर मानसी कुलकर्णी यांनी कंपनीबद्दल आणि तिच्या स्थापनेपासूनचा प्रवास थोडक्यात सांगितला. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या आशिदा इलेक्ट्रॉनिक्सच्या एकूण चार प्लांटला भेट दिली. त्या सर्व प्लांटमध्ये संबंधित प्लांट ऑपरेटर्सनी विद्यार्थ्यांना विविध ऑपरेटिंग प्रक्रिया, संरक्षण उपकरणे कसे बनवले जातात, त्यांची चाचणी कशी केली जाते, त्यांचे कार्य कसे घडते, त्यांचे इंटरलॉकिंग कार्य कसे करते, रेल्वे RCC (रिमोट कंट्रोल) मध्ये SCADA प्रणालीची भूमिका काय आहे हे दाखवले. रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणामध्ये विभागीकरण कसे केले जाते, स्वयंचलित ट्रिपिंग यंत्रणेद्वारे प्रत्येक विभागावरील ओव्हरलोडिंग कसे टाळले जाते या बद्दल माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली गेली. ही भेट यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने संचालक डॉ. कीर्ती आगाशे, उपप्राचार्य प्रा. अविनाश पवार, विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. सतीश घोरपडे यांचे विशेष सहकार्य लाभले.




दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाच्या १२ विद्यार्थ्यांनी HVDC पडघे सबस्टेशनला भेट दिली. या औद्योगिक भेटीत अभियंता सरफराज अहमद यांनी विद्यार्थ्यांना HVDC पडघे सबस्टेशन बद्दल सविस्तर माहिती सांगितली. पडघे सबस्टेशनला चंद्रपूरहून HVDC पॉवर मिळते आणि ती डीसी पॉवर एसी पॉवरमध्ये बदलून कळवा सबस्टेशनला पाठवण्यात येते. सुरुवातीला विद्यार्थ्यांना डीसी स्विच यार्ड युनिट मधील डीसी साइड अर्थिंग, फिल्टर दाखविण्यात आले. त्यानंतर एसी स्विच यार्ड युनिट मधील ट्रान्सफॉर्मर, एसी फिल्टर, स्मूथिंग रिॲक्टर्स, सर्किट ब्रेकर आणि इतर संरक्षण उपकरणे दाखवण्यात आली. या नंतर विद्यार्थ्यांना संपूर्ण कंट्रोल रूम मधील पॅनल, सिंगल लाइन डायग्राम आणि चंद्रपूर पासून पडघे ते मुंबईकडे वीज कशी पाठवली जाते हे दाखवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना थायरिस्टर्स व्हॉल्व्हही दाखविण्यात आले. कंपनीकडून अभियंता दीपक पाटील, श्री राम कोल्हे आणि सरफराज अहमद यांनी विद्यार्थ्यांना ही भेट संवादात्मक आणि यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.




दिनांक २७ ते ३० सप्टेंबर २०२२ दरम्यान महाविद्यालयाच्या पब्लिसिटीसाठी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या घरी भेटी दिल्या. यामध्ये बारावी उत्तीर्ण झालेले व अभियांत्रिकीची CET परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाबाबत व येथील अभ्यासक्रमाबाबत, तसेच महाविद्यालयातील शिष्यवृत्ती योजनेबाबत माहिती दिली.






दिनांक २९ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील Research committee ने ठरविल्याप्रमाणे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे Projects हे Research Paperच्या स्वरूपात प्रसिद्ध करणे अनिवार्य सुचविले आहे. त्यानुसार Research Paper कसा लिहावा व त्याचा Format याबद्दल स्थापत्य अभियांत्रिकी व विद्युत अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने यांनी केले.




''PARAKH'' पोर्टल हा प्रयोगशाळांच्या एकत्रित नेटवर्कवर देशभरातील प्रयोगशाळेच्या पायाभूत सुविधांच्या मॅपिंगसाठी भारत सरकारचा पुढाकार आहे. व्यवसाय सुलभता वाढविण्याच्या दिशेने हे एक पाऊल आहे. या पोर्टलमध्ये भौगोलिक माहिती प्रणालीवर देशातील सर्व एनएबीएल मान्यताप्राप्त आणि सरकारमान्य

प्रयोगशाळांचा समावेश आहे. प्रयोगशाळा शोधण्यासाठी आणि प्रयोगशाळेच्या सेवांचा लाभ घेण्यासाठी ही एक परस्परसंवादी आणि वापरकर्ता अनुकूल प्रणाली आहे, जी वापरकर्त्यास आवश्यक असलेल्या विविध पॅरामीटर्सवर आधारित आहे. प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील सर्व प्राध्यापकांनी AICTE PARAKH पोर्टलवर नोंदणी पूर्ण केली.

संशोधन क्षेत्रातील Google Scholar मध्ये महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने यांना १००० पेक्षा जास्त Citation प्राप्त झाले. तसेच त्यांचा H- index व i10 index सतरा आहे. अशाप्रकारे कमी कालावधीत जास्तीचा गुणांकन प्राप्त करणारे संस्थेमधील पहिले शिक्षक म्हणून ते ओळखले जात आहेत.




मुंबई विद्यापीठातर्फे ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या Ph.D Entrance Test (PET) परीक्षेत महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील प्रा. केशव चौगुले हे ७२% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. त्याचप्रमाणे स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील प्रा. भक्ती घोरपडे, प्रा. गीतांजली सावंत, प्रा. राजेश परदे, प्रा. शेखर सावंत यांनाही या परीक्षेत सुयश प्राप्त झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अविनाश पवार, संचालिका डॉ. सौ. कीर्ती आगाशे तसेच सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

दिनांक ३ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर २०२२ या सहा दिवशीय कालावधीत महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी "Adriano and its applications" या विषयावर ४० तासांची कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेचा फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या मिनी प्रोजेक्ट आणि मेगा प्रोजेक्टमध्ये झाला. या कार्यशाळेसाठी संचालक डॉ. कीर्ती आगाशे, प्रा. योगेश काटदरे, प्रा. मीना कश्यप, प्रा. वैशाली राणे, प्रा. प्रीती साठे, प्रा. वैभवी मेथा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांना काही प्रकल्पांचे प्रात्यक्षिक करता आले.



दिनांक ०४ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयात खंडेनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांनी युक्त असणाऱ्या संकुलामध्ये विविध विभागांच्या प्रयोगशाळां- मधील विविध उपकरणांची पूजा करण्यात आली. महाविद्यालयातील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन, स्थापत्य अभियांत्रिकी आणि मध्यवर्ती ग्रंथालय विभागामध्ये शिक्षक व शिक्षकत्तेर कर्मचारी आणि विद्यार्थी वर्गासमवेत एकत्रित विविध यंत्रांची व ग्रंथांचे पूजन करून आरत्या गायल्या. यावेळी प्रत्येक विभागात विद्यार्थ्यांनी आकर्षक सजावट केली होती व सुबक रांगोळ्या काढल्या होत्या. एकमेकांना दसरा सणाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचा शेवट पेढे वाटप करून करण्यात आला.



दिनांक ०४ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयात नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून खंडेनवमीच्या दिवशी महाविद्यालयातील नाना फडणवीस सभागृहात 'गरबा रास' खेळण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते.



दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन डेरवण येथील वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय यांच्या सहाय्याने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग यांनी केले. शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य श्री. अविनाश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. अशाप्रकारे शिबिरे आयोजित करून रक्तदानाचा प्रसार करण्याचा निर्धार डॉ. अमितकुमार माने यांनी व्यक्त केला. सदर शिबिर आयोजनासाठी प्रा. अरुण सरगर यांचे विशेष सहकार्य लाभले.




दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयाला 'महाराष्ट्रातील सर्वात प्रशंसनीय अभियांत्रिकी महाविद्यालय' म्हणून राज्यपालांच्या हस्ते गौरविण्यात आले. उच्च शिक्षणासाठी कोकण सारख्या ग्रामीण आणि दुर्गम भागात करत असलेल्या ह्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन Pride Of Nation Awards 2022 या समारंभात Asia Today ह्यांच्या कडून Most Admired Engineering College In Maharashtra (महाराष्ट्रातील सर्वात प्रशंसनीय अभियांत्रिकी महाविद्यालय) असा पुरस्कार राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री श्री. रामदास आठवले आणि विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या शुभहस्ते मुंबई येथे पार पडलेल्या एका शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार महाविद्यालयाच्या वतीने संचालिका डॉ. कीर्ती आगाशे यांनी स्वीकारला.




दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग व इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील शिक्षकांसाठी Python Programming या विषयावर गुगल मीटद्वारे ऑनलाईन एकदिवशीय कार्यशाळा पार पडली.

शरीराला आकार देणारा कुंभार म्हणजे व्यायाम!

दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे Project Presentation (प्रकल्प सादरीकरण) आयोजित केले होते. त्यानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने यांचे 'शोधनिबंध कसा लिहावा?' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. विभागातील विद्यार्थी व सर्व प्राध्यापक या व्याख्यानाला उपस्थित होते. सदर व्याख्यान विद्यार्थी व शिक्षकांसाठी अतिशय माहितीपूर्ण आणि उपयोगी ठरले. भविष्यातील पदव्युत्तर शिक्षण, संशोधन इ. साठी हे व्याख्यान नक्कीच उपयुक्त होते.



दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील इंस्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातर्फे एक दिवसीय औद्योगिक क्षेत्र भेट आयोजित करण्यात आली. मूलभूत आणि प्रगत बायोमेडिकल उपकरणांचे ज्ञान मिळवण्यासाठी कृष्णा हॉस्पिटल आणि वैद्यकीय संशोधन केंद्र, कराड येथे यशस्वीपणे औद्योगिक भेट पूर्ण केली. या भेटीत प्रा.केशव चौगुले व प्रा.मीना कश्यप या दोन प्राध्यापकांसह एकूण १४ विद्यार्थी सहभागी झाले होते.




दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने गोव्यातील क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंपनीला यशस्वीरित्या औद्योगिक भेट दिली. सदर कंपनी थ्री फेज इंडक्शन मोटर तयार करते जी आधुनिक उद्योगांमध्ये आजकाल सर्वात लोकप्रिय इलेक्ट्रिकल मशीन आहे. क्रॉम्प्टन ही इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी क्षेत्रातील अतिशय प्रसिद्ध कंपनी आहे. या भेटीदरम्यान कंपनी व्यवस्थापनचे श्री. गजेंदे परब (एचआर मॅनेजर) यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सहकारी श्री. अभिजीत भोजे, श्री. शुभम दराणे व श्री. साहिल कुबडे यांनी मोटार निर्मितीच्या संपूर्ण प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन केले. सुरुवातीला वाइंडिंग मेकिंग दाखवण्यात आले, नंतर स्टेटर स्लॉटच्या आतील परिघातील वायंडिंग असेंब्ली, नंतर रोटर एंड रिंग्ज आणि बेअरिंग असेंब्ली, त्यानंतर मोटरचे इन्सुलेशन मजबूत करण्यासाठी पूर्णपणे वार्निश कसे केले जाते हे देखील दाखवले गेले. त्याचप्रमाणे विविध प्रकारचे मोटर फ्रेम्स, कूलिंग फॅन्स इ. देखील दाखवले गेले. या भेटीत इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या तृतीय वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या एकूण २७ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सदर क्षेत्र भेट घडवून आणण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.विजय बेडेकर, संचालिका डॉ.कीर्ती आगाशे, उपप्राचार्य अविनाश पवार व विभागप्रमुख प्रा.सतीश घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यक्षेत्र भेट यशस्वी संपन्न झाली.



दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील महिला विकास कक्षाने विद्यार्थिनी, प्राध्यापक आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'Cyber Security and Cyber Crime' या विषयावर एक दिवसीय कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी गुहागर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आनंदराव पवार, श्री. पवन कांबळे व श्रीमती स्वामिनी नाटेकर यांनी सर्व सहभागींना संबोधित केले.

कलम ३५४, ३७६ सारखे सर्व कायदेशीर अधिकार स्पष्ट केले जे त्यांना सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात मदत करू शकतात. त्याचसोबत त्यांनी सर्व उपस्थितांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या सुरक्षित आणि सुरक्षित वापराविषयी समजावून सांगितले. तसेच त्यांनी 'सायबर क्राईम कायदे' सारख्या व्यासपीठाची माहिती दिली जी संस्थेतील मुली, महिला प्राध्यापक वापरू शकतात.



दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने डॉ. हेमंत धोंडे यांचे 'उद्योजकता आणि करिअर संधी' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी त्यांनी काँक्रिट मॅच्युरिटी मीटरच्या नावीन्यपूर्ण डिझाईनबद्दल आणि पुढील करिअरच्या संधी आणि विद्यार्थ्यांसाठी उच्च अभ्यास याबद्दल सर्व तपशील स्पष्ट केले. त्यांनी सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. यावेळी एकूण २४ विद्यार्थी आणि ९ प्राध्यापक उपस्थित होते.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाद्वारे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाइल मॅन असणारे थोर वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व विशद करताना महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती आगाशे यांनी डॉ. कलाम यांची वाचनामुळे झालेली अभ्यासूवृत्ती व वाचनाचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना सांगितले. विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ग्रंथालयातील नवीन पुस्तकांची ओळख व्हावी यासाठी 'पुस्तकांचा खजिना' या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे व पुस्तकांचे पूजन महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. आगाशे, उप-प्राचार्य अविनाश पवार, ग्रंथपाल संतोष चतुर्भूज यांनी केले. यावेळी विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयात External Audit पार पडले. यावेळी महाविद्यालय परीक्षणा करिता डॉ. संगीता जोशी, डायरेक्टर IQAC, विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी वडाळा आणि डॉ. भावेश पटेल, प्राचार्य-शाह कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, चेंबूर यांची उपस्थिती लाभली होती.



दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातर्फे गुहागर तालुक्यातील पालशेत येथील श्रीमती आर.पी.पी. विद्यालय, पालशेत विद्यालयातील विद्यार्थ्यांना Arduino Kit चा वापर करून प्रोजेक्ट बनवण्याचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची ओळख आणि आवड निर्माण होण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला. लहान वयातच नवनवीन

प्रोजेक्ट बनविण्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी यासाठी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील एकूण ३० विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण या महाविद्यालयातर्फे देण्यात येत आहे. यामुळे विद्यालयातील अटल टिंकरींग लॅब मधील साधनांचा पण योग्य उपयोग होईल असे महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती आगाशे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती आगाशे व त्यांचे सहकारी प्रा. वैशाली राणे, प्रा. मीना कश्यप, प्रा. भरत पवार व श्री. संदीप नागवेकर हे उपस्थित होते. या उपक्रमासाठी श्रीमती आर. पी. पी. विद्यालय, पालशेतच्या मुख्याध्यापिका सौ. ढेरे मॅडम, चंद्रकांत कोळेकर व श्री. बिर्जे सरांचे सहकार्य लाभले.



दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक योग्यता चाचणी यशस्वीरित्या आयोजित केली. सदर अभियोग्यता चाचणी ५० गुणांची होती. त्यात २० गुणांची तांत्रिक योग्यता, १५ गुणांची संख्यात्मक योग्यता आणि १५ गुणांची शाब्दिक अभियोग्यता असे स्वरूप होते. यावेळी महाविद्यालयातील एकूण १४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते.



दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी विभाग व इंन्स्ट्रूमेंटेशन अभियांत्रिकी विभाग आणि Institution's Innovation Council (IIC) यांच्या संयुक्त विद्यमाने 'Idea Competition' ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आरोग्यसेवा आणि बायोमेडिकल, स्मार्ट वाहन/इलेक्ट्रिक वाहन, रोबोटिक्स आणि ड्रोन, कृषी आणि ग्रामीण विकास, अन्न प्रक्रिया, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणी, नविकरणीय आणि परवडणारी ऊर्जा, IOT आधारित तंत्रज्ञान, नवकल्पना आणि स्टार्टअप संधीचे इतर उदयोन्मुख क्षेत्र यासारखे विविध विषय ठेवण्यात आले होते. सदर स्पर्धेत नऊ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. मीना कश्यप व प्रा. भारत पवार यांनी काम पाहिले.




दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने ‘एकता दौड व प्रतिज्ञा’ हे कार्यक्रम आयोजित केले. यावेळी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती आगाशे यांनी सरदार वल्लभ भाई पटेल यांची माहिती आणि या दिवसाचे महत्त्व सांगितले. सर्व उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ‘एकता दिवसाची’ शपथ घेतली.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.